

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. MAHMAR 2023/84526

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिना निमित्त विनम्र अभिवादन

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४९ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.६ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# पुढील वर्षी महापरिनिर्वाण दिन इंदू मिल स्मारकावर

## मुख्यमंत्री अन् उपमुख्यमंत्र्यांचं आश्वासन : महापरिनिर्वाण दिनी बाबासाहेबांना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून अभिवादन!

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी येथे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार राहुल शेवाळे, आमदार आशीष शेलार,आमदार प्रवीण दरेकर, आमदार कालिदास





कोळंबकर,मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल आदींनी पुष्पचक्र अर्पण करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

पुढील वर्षी महापरिनिर्वाण दिन इंदू मिल स्मारकावर साजरा करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. जगाला हेवा वाटेल असं हे स्मारक असणार आहे. अनेक कल्याणकारी योजना राबवत आहोत, असे एकनाथ शिंदे म्हणाले. डॉ. आंबेडकर यांचे भव्य असे स्मारक इंदू मिलच्या जागी उभारले जात असून हे काम वेळेत पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे एकनाथ शिंदेंनी यावेळी सांगितले.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनामध्ये केलेलं काम भारताच्या निर्मितीचे पहिलं पाऊल ठरलं आहे. त्यामुळेच आपण त्यांना महामानव म्हणतो, कारण जिथे लोकांचे विचार संपतात तिथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सुरू व्हायचे आणि म्हणूनच आज देशाच्या या वाटचालीमध्ये त्यांचा इतका मुलाचा वाटा आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. मला या गोष्टीचा समाधान आहे, ज्या वर्षी इंदू मिलवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं स्मारक व्हावं अशा प्रकारची मागणी झाली होती, त्यावेळेस मला मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी पंतप्रधान मोदीजींना आम्ही विनंती केली आणि इंदू मिलची जागा आपल्याला मिळाली, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

# उद्यापासून ट्रीपल इंजिन सरकारशी विरोधकांचा लढा

## हिवाळी अधिवेशनात खडाजंगीचे संकेत

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मध्य प्रदेश, छत्तीसगड व राजस्थानच्या यशामुळे उत्साह वाढलेल्या ट्रीपल इंजिन सरकारचा उद्या, गुरुवारपासून मनोबल खचलेल्या विरोधकांशी सामना होणार आहे.

आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात निर्माण झालेली सामाजिक परिस्थिती, अवकाळी पावसामुळे नुकसान, वाढती महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारीवरून सरकारला खिंडीत गाठण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जाईल, तर 'निकाला'चे अस्त्र समोर करून सत्ताधारी विरोधी धार बोथट करण्याचा प्रयत्न करतील. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात निर्माण झालेल्या सामाजिक स्थितीवर विधिमंडळात चर्चा होणार असून, सरकारकडून तसा प्रस्ताव मांडला जाणार आहे. या प्रस्तावावरील चर्चेत सभागृहात खडाजंगी होण्याचे संकेत आहेत.

**चहापानावर विरोधक टाकणार बहिष्कार?**

अधिवेशनाची रणनीती आखण्यासाठी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या बंगल्यावर बुधवारी विरोधकांची बैठक आहे, तर सायंकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'बंगल्यावर चहापान आयोजित केला आहे. सरकार हुकूमशाही कारभार करत असल्याचे सांगत विरोधक चहापानावर बहिष्कार घालण्याची शक्यता आहे.

# निर्मला सीतारामन यांना फोर्ब्सच्या यादीत ३२ वं स्थान, शक्तिशाली महिलांमध्ये नावाचा समावेश

## जगातील १०० शक्तिशाली महिलांमध्ये स्थान




**दि.६विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

फोर्ब्सच्या शक्तिशाली महिलांच्या वार्षिक यादीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पुन्हा एकदा जगातील १०० शक्तिशाली महिलांमध्ये स्थान मिळवलं आहे. या यादीत त्या ३२ व्या स्थानी आहेत. या यादीमध्ये राजकारण आणि धोरणं, व्यवसाय, फायनान्स, मीडिया आणि मनोरंजन अशा विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या जगभरातील प्रभावशाली महिलांचा समावेश आहे. फोर्ब्सनं ६४ वर्षीय निर्मला सीतारामन यांना भारतातील राजकारण आणि धोरणांमधील योगदानासाठी या यादीत स्थान दिलंय.

निर्मला सीतारामन यांच्याकडे २०१९ मध्ये भारताच्या अर्थमंत्रीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. यासोबतच त्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रीही आहेत. राजकारणातील कारकिर्दीपूर्वी, सीतारामन यांनी यूके स्थित असोसिएशन ऑफ ॲग्रिकल्चरल इंजिनियर्स आणि बीबीसी वर्ल्ड सर्व्हिसमध्ये महत्त्वाच्या भूमिका बजावल्या. राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्या म्हणूनही त्यांनी मोठ्या प्रमाणावर काम केलं आहे.

### 'या' भारतीयांचा समावेश

फोर्ब्सनं आपली छाप सोडलेल्या इतर उल्लेखनीय भारतीय महिलांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील रोशनी नाडर यांना या यादीत ६० नं स्थान, व्यवसायात सेलच्या सोमा मंडल यांना ७० वं आणि किरम मुजुमदार शॉ यांना यादीत ७६ वं स्थान दिलंय.

### कशी होते निवड?

दरवर्षी, अमेरिकन बिझनेस मॅगझिन जगातील १०० सर्वात शक्तिशाली महिलांची यादी प्रसिद्ध करते. फोर्ब्सनुसार ते चार प्रमुख मेट्रिक्सच्या आधारे रँकिंग निर्धारित केलं जातं: पैसा, मीडिया, प्रभाव आणि प्रभावाचे क्षेत्र. राजकीय नेत्यांसाठी, मासिकानं जीडीपी आणि लोकसंख्या हे त्याचे मापदंड घेतले आहेत, तर कॉर्पोरेट प्रमुखांसाठी, महसूल, मूल्यांकन आणि कर्मचाऱ्यांची संख्या घेतली आहे.

# अधिवेशनात राष्ट्रवादीचं कार्यालय अजित पवार गटाला देण्याचा अध्यक्षांचा निर्णय; वाद पेटणार!




**दि.६विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उद्या ७ डिसेंबरपासून उपराजधानी नागपूर येथे सुरू होत आहे. मराठा आरक्षण, अवकाळी पावसाने झालेलं शेतकऱ्यांचं नुकसान अशा मुद्द्यांवरून यंदाचं अधिवेशन गाजण्याची शक्यता आहे. मात्र अधिवेशनाला सुरुवात होण्याआधीच वादंग निर्माण झालं आहे. कारण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नागपूर विधिमंडळ परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय हे अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाच्या आमदारांना देण्याचा निर्णय घेतला आहे.

अधिवेशन काळात विधिमंडळातील राष्ट्रवादीचं कार्यालय आम्हाला देण्यात यावं, अशी मागणी काही दिवसांपूर्वी अजित पवार गटाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. अध्यक्षांनी ही मागणी मान्य करत सदर कार्यालय अजित पवार गटाला देण्याचा निर्णय घेतला असून या कार्यालयावर अजित पवार गटाचे नेते आणि मुख्य प्रतोद अनिल पाटील यांच्या नावाची पाटीही लावण्यात आली आहे.

विधिमंडळाच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत नागपुरातील हिवाळी अधिवेशन ७ ते २० डिसेंबर या कालावधीत चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. या कालावधीत एकूण १० दिवसांचे काम असेल. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६० हजार कोटींहून अधिक किंमतीच्या पुरवणी मागण्या मांडल्या जाणार आहेत. त्यावर ११ आणि १२ डिसेंबरला चर्चा होण्याची शक्यता आहे. तसेच ८ डिसेंबरला मराठा आरक्षणावर चर्चा होणार आहे. प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न विचारण्यासाठी आतापर्यंत दोन्ही सभागृहात आमदारांनी १,३१८ लक्षवेधी तर ९,२३१ प्रश्न मांडले आहेत.

# रेवंत रेड्डी हे तेलंगणाचे नवे मुख्यमंत्री उद्याला मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

तेलंगणा राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार याची उत्सुकता आता संपली आहे. तेलंगणामध्ये सर्वाधिक जागा जिंकून काँग्रेसची सत्ता आली आहे. काँग्रेसने ११९ मतदारसंघांपैकी ६४ जागा जिंकल्या आहेत. मात्र, मुख्यमंत्री पदावर कोण बसणार याबाबत चित्र स्पष्ट होत नव्हते. मुख्यमंत्री कोण? यावरून सुरू असलेल्या सस्पेंसमध्ये काँग्रेसने एक खळबळजनक निर्णय घेतला. राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून दिल्ली हायकमांडने रेवंत रेड्डी यांच्या नावाला पसंती दिली आहे. तशी अधिकृत घोषणा काँग्रेसने केली आहे. गुरुवारी ७ डिसेंबर रोजी रेवंत रेड्डी हे



तेलंगणाचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील.

रेवंत रेड्डी हे तेलंगणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्याच नेतृत्वाखाली काँग्रेसने तेलंगणामध्ये निवडणुका लढली होती. रेवंत रेड्डी यांनी बहुमतापेक्षा अधिक जागा जिंकून काँग्रेसला सत्तेची दारे उघडी केली. त्यामुळेच त्यांच्या नावाला काँग्रेस हायकमांडने पसंती दिली. गुरुवारी ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत.

काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेते उत्तम कुमार रेड्डी आणि भट्टी विक्रमार्क यांनीही मुख्यमंत्रीपदावर दावा सांगितला होता. मात्र, हायकमांडने त्यांना उपमुख्यमंत्रीपद किंवा चांगला पोर्टफोलिओ देण्यास सांगितले आहे अशी माहिती सूत्रांनी दिली. तसेच, रोटेशनल सीएम यासारखा कोणत्याही फॉर्म्युल्या करण्यात येणार नाही असेही या सूत्रांनी स्पष्ट केले.

# निवृत्त शिक्षणाधिकाऱ्याकडे ८३ लाखांची अपसंपदा, गुन्हा दाखल

**दि. ६ विदर्भ प्रजासत्ताक सांगली :**

सांगलीतील निवृत्त शिक्षणाधिकारी विष्णु कांबळे यांच्याकडे भ्रष्टाचाराच्या मार्गाने मिळविलेली ८३ लाखांची मालमत्ता चौकशीमध्ये आढळून आल्याने त्यांच्यासह पत्नी विरूद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे उप अधिक्षक संदीप पाटील यांनी बुधवारी दिली. निवृत्तीच्यावेळी माध्यमिक विभागाचे तत्कालिन शिक्षणाधिकारी कांबळे हे लाच घेत असताना लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात सापडले होते. या प्रकरणी त्यांच्याविरूध्द ७ मे २०२२ रोजी गुन्हाही दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करीत असताना त्यांच्या घराची झडती घेण्यात आली असता १० लाख रूपये रोख आढळून आले होते. या रकमेबाबत त्यांना समाधानकारक खुलासा करता आलेला नव्हता. लाच घेत असताना सापडल्यामुळे कांबळे व त्यांच्या पत्नी जयश्री कांबळे यांच्या मालमत्तेची खुली चौकशी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

# आमदार अपात्रतेबाबत ३१ तारखेपर्यंत निर्णय घेण्याचा माझा प्रयत्न : राहुल नार्वेकर

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

शिवसेना आमदार अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांचं मोठं विधान केले आहे. ३१ तारखेपर्यंत निर्णय घेण्याचा माझा प्रयत्न असून कायदेशीर निर्णय घेईन, असे आश्वासन नार्वेकरांनी दिलं आहे. एका कार्यक्रमादरम्यान राहुल नार्वेकर माध्यमांशी बोलत होते.



राहुल नार्वेकर म्हणाले की, आमदार अपात्रता प्रकरणी निर्णय लवकर घेण्याचा प्रयत्न आहे. ३१ तारखेपर्यंत निर्णय व्हावा असं सुप्रीम कोर्टाने सुद्धा सांगितले आहे आणि माझाही असाच प्रयत्न आहे. अधिवेशन काळात सुनावणी घेऊन निश्चित लवकर निर्णय घेईल. कायदेशीर निर्णय होईल असे मी सगळ्यांना आश्वासित करतो, असे त्यांनी म्हंटले आहे.

तसेच, बाबासाहेबाना लाखो बांधवांसोबत मी सुद्धा पुण्यस्मृतीस अभिवाद करण्यासाठी आलो आहे. देशाला संपूर्णपणे यशस्वी करण्यासाठी जगातील संविधान प्राप्त करून दिले अशा बाबासाहेबांप्रती आपली आत्मीयता आणि अत्यंत महत्वाच्या व्यक्तीसाठी अभिवादन करू शकलो हे माझं भाग्य समजतो, असेही नार्वेकर म्हणाले आहे.

दरम्यान, सभागृहाचे कामकाज असो किंवा राज्य शासन चालवायचे असो हे सगळे संविधानावर चालते. मी जनतेला आश्वासीत करू सांगतो की संविधानाने दिलेल्या तरतुदींची कुठेही पायमल्ली होणार नाही. नियमानुसार सभागृह आणि संविधानाचे आदर राखत काम चालवणार असल्याचेही नार्वेकरांनी म्हंटले आहे.

# छत्रपती संभाजीराजे यांचे महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पत्र

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक कोल्हापूर**

मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसले होते. आता मनोज जरांगे पाटील हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. राज्यभरात ते सभा घेत आहेत. याच पार्श्वभूमीवर आता मराठा आरक्षणासाठी संभाजीराजे छत्रपती यांनी महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पत्र लिहिलं आहे.

मनोज जरांगे पाटील यांचे महाराष्ट्रात सुरु असलेले आंदोलन व महाराष्ट्र दौरा तसेच युवकांच्या आत्महत्यांचा उल्लेख करत मराठा आरक्षण मिळविण्यासाठी सर्व खासदारांची एकी महत्वाची असल्याचे छत्रपती संभाजीराजेंच्या या पत्रातुन दिसुन येत आहे.

छत्रपती संभाजीराजेंनी पत्रात लिहिलं की, मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी मागील काही वर्षांपासून संघर्ष करत आहे. यासाठी अनेक भव्य मोर्चे, आंदोलने, उपोषणे झालेली आहे. काही युवकांनी यासाठी आत्महत्या सारखा टोकाचा मार्ग निवडला. समाजाच्या भावना तीव्र आहेत. तरीही मराठा समाजाने आपली मागणी अतिशय शांततेच्या



आणि संविधानिक मार्गाने पुढे आणलेली आहे.मराठा समाजाच्या मागणीला प्रतिसाद देवून २०१४ मध्ये पृथ्वीराज चव्हाण सरकारने तर २०१८ मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र कायदेशीर पातळीवर हे आरक्षण टिकले नाही. मी स्वतः २००७ पासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्रात सातत्याने जनजागृती करत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अनेक आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदवत काही आंदोलने स्वतः देखील केली आहे. या पार्श्वभूमीवर माझी आपणास कळकळीची विनंती आहे की याबाबत आपण हिवाळी अधिवेशनात लोकप्रतिनिधी या नात्याने आवाज उचलणे आवश्यक आहे. या विषयी लवकरच नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील सर्व लोकसभा, राज्यसभा खासदारांनी एकत्रित मराठा आरक्षण मिळवण्याबाबत ठोस भूमिका ठरवण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. या बैठकीचे सविस्तर निमंत्रण मी लवकरच आपणास पाठवेल. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत आणि समाजाला न्याय मिळावा हि विनंती. असे त्यांनी पत्रात लिहिलं आहे.

संपादकीय ......

# भाजपचे 'मिशन ४००' अन् 'इंडिया' आघाडीचे आव्हान

तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीसाठीच्या तयारीला आणखी वेग दिला आहे. त्यादृष्टीने संघटनात्मक पातळीवर काम सुरू असून दुसरीकडे केंद्र सरकारदेखील आगामी काही दिवसात लोकप्रिय घोषणा करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपकडून आता ४०० हूनअधिक जागा जिंकण्याचा प्रयत्न सुरू आहे. हिंदी भाषिक पट्ट्यात भाजपकडे सर्वाधिक लोकसभेच्या जागा आहेत. त्यामुळे आता ही कामगिरी पुन्हा एकदा करण्याची तयारी भाजपने केली आहे. त्याशिवाय, 'मिशन ४००' गाठण्यासाठी भाजपला देशभरातील सर्व राज्यांमध्ये जागा जिंकाव्या लागणार आहेत.

लोकसभा निवडणुकीला जवळपास पाच महिने उरले आहेत. तीन राज्यांमध्ये लोकसभेच्या ६५ जागा भाजपने जिंकल्या आहेत, त्यापैकी सध्या भाजपकडे ६१ जागा आहेत. बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश, दिल्ली, झारखंड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या हिंदी भाषिक राज्यांमध्ये १९३ जागा आहेत. या राज्यांतील १७७ जागांवर भाजपचे खासदार आहेत.

भाजपसमोर या राज्यांतील आपल्या जागा टिकवून ठेवण्याचेच नव्हे तर संख्याबळ वाढवण्याचे आव्हान आहे. ११ राज्यांमध्ये जागा वाढण्यास फारसा वाव नाही. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये भाजप सर्वाधिक जागा जिंकू शकेल असे गृहित धरले तरी पूर्ण बहुमत मिळवण्यासाठी पश्चिम बंगाल, आसाम, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये २०१९ च्या कामगिरीची पुनरावृत्ती करावी लागेल. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने बंगालमध्ये १८ जागा, महाराष्ट्रात २३ जागा आणि गुजरातमध्ये सर्व २६ जागा जिंकल्या. बंगाल, महाराष्ट्रात चांगल्या कामगिरीसाठी भाजपला जोर लावावा लागणार आहे.

मागील दोन लोकसभा निवडणुकीत भाजप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चेहऱ्यावर मैदानात उतरली. त्याच्या परिणामी भाजपला पूर्ण बहुमत मिळाले. मात्र, मोदी लाट असतानादेखील भाजपला काही राज्यांमध्ये खाते उघडा आले नाही. भाजपने काश्मीर ते बिहार या उत्तर भारतातील सर्व जागा जिंकल्या तरी त्यांना २४५ जागा मिळतील. मात्र, एवढं निर्भेळ यश मिळवणे भारतीय राजकारणात कठीण आहे. त्याशिवाय भाजपला ४०० जागा मिळवण्यासाठी केरळ, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांमध्येदेखील प्रत्येकी किमान १० जागांवर विजय मिळवावा लागणार आहे. ही बाबदेखील आव्हानात्मक आहे. या राज्यांतील एकूण ११८ जागांपैकी भाजपकडे फक्त चार जागा आहेत, ज्या तेलंगणात जिंकल्या होत्या. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील, देशातील राजकीय परिस्थितीत बदल झाला आहे. २०१९ च्या निवडणुकीत भाजपसोबत असणारे मित्रपक्षांमध्ये फूट पडली आहे किंवा त्यांनी भाजपची साथ सोडली आहे. महाराष्ट्रात शिवसेनेचे दोन गट झाले आहेत. बिहारमध्ये नितीशकुमार आता महागठबंधन सोबत आहेत. पंजाबमध्ये शिरोमणी अकाली दलाने भाजपची साथ सोडली आहे. पंजाबमध्ये काँग्रेस, आप, शिरोमणी अकाली दलासोबत भाजपला दोन हात करावे लागणार आहेत. काश्मीरमध्येही ३७० कलम हटवल्यानंतर पहिल्यांदा लोकसभा निवडणूक होणार आहे.

# एचआईव्ही जनजागृती रॅलीला मान्यवरांनी दाखविली हिरवी झेंडी

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** एचआईव्ही जनजागृतीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय व विविध सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आज रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.



जिल्हा सामान्य रुग्णालय येथून आज सकाळी रॅली सुरु झाली. यामध्ये नर्सिंग इन्स्टिट्यूट जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, डॉ पंजाबराव भाऊसाहेब देशमुख नर्सिंग महाविद्यालय, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनजमेण्ट बडनेरा, श्रीमती विमलाबाई देशमुख महाविद्यालय, शासकीय तंत्र निकेतन, शासकीय औषधी निर्माण शास्त्र महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय बडनेरा, विद्याभारती औषध निर्माण महाविद्यालय, विदर्भ युथ वेलफेअरे औषध निर्माण महाविद्यालय बडनेरा, विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, महात्मा फुले महाविद्यालय भातकुली, गोडे इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, स्थानिक विविध सामाजिक संघटना व विविध शैक्षणिक संस्थांचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, डॉ. गोविंद कासट, आयएमएचे अध्यक्ष डॉ. आश्विनीकुमार देशमुख, सचिव डॉ. भूपेश भोंड, स्त्री रोग संघटनेच्या डॉ. सुयोगा पानट, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदिप निरवणे, निवासी वैद्यकीय अधिकारी बाह्यसंपर्क डॉ. संदीप हेडाऊ, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, डॉ. पद्माकर सोमवंशी, डॉ. रघुनाथ वाडेकर, डॉ. संदीप दानखडे, डॉ. अलका कुथे, डॉ श्रीरंग ढोले, डॉ, संध्या खराते, डॉ प्रिती मोरे, डॉ ज्योत्स्ना किटुकाळे तसेच जिल्हा सामान्य रुणालयातील डॉक्टर्स, स्टाफ नर्स, कर्मचारी व अधिकारी आदी उपस्थित होते.

ही रॅली रेल्वे स्टेशन, राजकमल, श्याम चौक, जयस्तंभ चौक, कॉटन मार्केट चौक, इर्विन चौक येथे मार्गस्थ होऊन जिल्हा सामान्य रुग्णालय येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. एचआयव्ही जनजागृतीपर घोषणा देण्यात आले. तसेच विविध संस्थाच्या चित्ररथाव्दारे जनजागृती करण्यात आले. जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा क्षय रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय सोबतच ५ उपजिल्हा रुग्णालय, ९ ग्रामीण रुग्णालय, ६० प्राथमिक आरोग्य केंद्र, ७० खाजगी रुग्णालय, २ लैगिक आजार समुपदेशन व उपचार केंद्र, शासकीय रक्तपेढी, ४ खाजगी रक्तपेढी तसेच सरकार मान्य एच आई व्ही साठी कार्यरत सामाजिक संस्था, अमरावती शहरातील महाविद्यालय, विविध क्लब, विविध संघटना जनजागृती रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

जिल्ह्यात अतिजोखीम गटासाठी विविध संस्था कार्यरत असून यामध्ये स्थलांतरित कामगारासाठी भाग्योदय बहुउदेशीय संस्था अमरावती, गाव पातळीवर लिंक वर्कर कार्यक्रमासाठी तसेच शहरी भागातील देहविक्री करणाऱ्या स्त्रियांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडल मोझरी, ग्रामीण व शहरी भागातील देहविक्री करणाऱ्या स्त्रियांसाठी सत्यदेव बाबा महिला मंडल मोझरी, ट्रक चालक तसेच वाहक व इतर संलग्नित व्यक्तीसाठी श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, तृतीयापंथी, पुरुष व पुरुष यांच्या मध्ये शारीरिक संबंध ठेवणाऱ्या गटाकरिता समर्पण ट्रस्ट अमरावती, एचआईव्ही संक्रमित व्यक्तीचे जीवनमान उंचावण्यासाठी आधार बहुउदशीय संस्थेच्या माध्यमातून या सर्व जोखीम गटाचे समुपदेशन, तपासणी, इतर सुविधाबाबत माहिती या कार्यक्रमाचे प्रकल्प व्यवस्थापक ब्रिजेश दळवी, अंजली देशमुख, राजेंद्र साबळे, राजेश तुपाने, परमेश्वर मेश्राम, आनंद लिल्हारे यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन उमेश आगरकर व ब्रिजेश दळवी यांनी तर आभार प्रदर्शन अजय साखरे यांनी केले.

# अंबा रुख्मिणी महोत्सव २०२३ च्या उदघाटन सोहळ्यात मिर्झा एक्सप्रेस ची धमाल

## जगद्गुरू रामराजेश्वराचार्यजी महाराज यांच्या प्रबोधनातून सभ्यता व संस्कृतीचे दर्शन

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक कौडण्यपूर –** विदर्भाची पुरातन राजधानी, माता रुख्मिणीचे माहेरघर कुलस्वामिनी अंबिका मातेचे शक्तीपीठ असलेले क्षेत्र कौडण्यपूर येथील महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव २०२३ चे उदघाटन दिनांक २ डिसेंबर २०२३ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. फटाक्यांच्या आतिषबाजीत व स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.




उदघाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जगद्गुरू रामानंदाचार्य श्री रामराजेश्वराचार्यजी माउली सरकार यांची उपस्थिती होती. तर स्वागताध्यक्ष म्हणून भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य रविराज देशमुख, उदघाटक वर्धा जिल्हा लोकसभा प्रमुख सुमित वानखडे, विशेष अतिथी म्हणून भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य निवेदिता ताई दिघडे, त्याचबरोबर विशेष आकर्षण म्हणून आमंत्रित मिर्झा एक्सप्रेस फेम मिर्झा रफी अहमद बेग व अभिनेता तसेच रिल्स स्टार विशाल पिसाट तर सत्कारमूर्ती म्हणून आमंत्रित माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, प्रा. रंजनसेन शेंडे, लेखक ओमप्रकाश पाखरे, तसेच भागवताचार्य ह. भ. प. संजय महाराज ठाकरे, शिवसेना वर्धा जिल्हा सहसंपर्क प्रमुख निलेश देशमुख, सामाजिक कार्यकर्ते अश्विन भाऊ शेंडे, सरपंच प्रेमदास राठोड, दिनेश वानखडे आदींची विशेष उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण महोत्सवाची पार्श्वभूमी व यावर्षी आयोजित सर्व कार्यक्रमांची रूपरेषा अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अक्षय पुंडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून मांडली. स्वागताध्यक्ष रविराज देशमुख यांनी अंबा रुख्मिणी महोत्सवाच्या उदघाटन सोहळ्याला आमंत्रित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. त्याचबरोबर या महोत्सवामध्ये राज्यस्तरीय स्पर्धा व विविध कार्यक्रमांचे आयोजन पुढील काळात करण्याचे आश्वासन दिले. तर जगद्गुरू रामानंदाचार्य श्री रामराजेश्वराचार्यजी माउली सरकार यांनी आपल्या प्रबोधनातून सभ्यता व संस्कृतीचे दर्शन घडविले. त्याचबरोबर अंबा रुख्मिणी महोत्सव समितीच्या आयोजनाबाबत सकारात्मक भूमिका दर्शवित युवकांच्या नेहमी पाठीशी असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. त्यानंतर विशेष आकर्षण व विशेष सत्कारासाठी आमंत्रित सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी मिर्झा रफी अहमद बेग व अभिनेता विशाल पिसाट यांचा सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा चे माजी विद्यार्थी व अंबा रुख्मिणी महोत्सव समितीद्वारे आयोजित विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांचा सर्व माजी विद्यार्थ्यांद्वारे सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून प्रा. रंजनसेन शेंडे यांचा सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी मिर्झा रफी अहमद बेग यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच शहिद भगतसिंग या पुस्तकाचे लेखक ओमप्रकाश पाखरे यांचासुद्धा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उदघाटन सोहळ्याच्या यशस्वितेकरिता उत्सव समिती अध्यक्ष अमोलभाऊ शेंडे, सल्लागार समितीचे बाळूभाऊ ठाकरे, सचिव गजाननराव बांबल, उपाध्यक्ष मैताब शाह, दिनेशभाऊ ठाकरे, तंटामुक्ती अध्यक्ष अंकुश देऊळकर, अमोल पुंडेकर उत्सव समिती सचिव सचिन करडे, उपाध्यक्ष प्रयास भाकरे, निखिल ठाकरे, मुकेश पवार, स्वप्नील खेडकर, आकाश ठाकरे, प्रशांत ठाकरे, दीपक केवदे, शुभम बोके, आनंद मनोहर, अंकुश पुंडेकर, वैभव ठाकरे, प्रदीप सुरजुसे, यश बाहे, लकी नेमाडे, प्रथमेश ठाकरे, सुरज केवदे, अर्पित डुबे, कुणाल पुंडेकर, तेजस आसेकर, सार्थक ठाकरे, सौरभ ठाकरे, दक्ष खंडारे, ओम राऊत, प्रतीक नेवारे, चेतन नेमाडे, तसेच महिला समितीच्या अश्विनी विलायतकर, स्वेता बांबल, राधा महल्ले, पूनम ठाकरे, नूतन ठाकरे, देवयानी ठाकरे, पूर्वा अर्मळ, वैष्णवी डुबे, राधा ठाकरे, गुंजन खंडारे तसेच उत्सव समिती, सल्लागार समिती व महिला समिती च्या सर्व सदस्यांनी अथक घेतले. त्याचबरोबर सन्मान चिन्हाचे प्रायोजक सद्गुरुकृपा हॉटेलचे संचालक प्रतीक कदम, दुर्गवाडा उपसरपंच संदीप ठाकरे, योगेश मलमकर यांचे सुद्धा विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन अश्विनी विलायतकर व स्वेता बांबल यांनी तर देवयानी ठाकरे व नूतन ठाकरे यांनी सुमधुर स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक अक्षय पुंडेकर यांनी तर आभार प्रदर्शन गजाननरावजी बांबल यांनी केले.

कवी मिर्झा रफी अहमद बेग यांच्या वऱ्हाडी एक्सप्रेस व रिल्स स्टार विशाल पिसाट यांच्या विनोदी शैलीने महोत्सवात रंगत सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी मिर्झा एक्सप्रेस फेम मिर्झा रफी अहमद बेग यांच्या वऱ्हाडी एक्सप्रेस ने महोत्सवामध्ये एकच रंगत आणली. प्रेक्षकांना खळखळून हसवत एकाहून एक विनोदी किस्से आपल्या अनोख्या शैलीने त्यांनी मांडले. साहित्य क्षेत्रातील गाजलेल्या अनेक कविता सुद्धा त्यानी यावेळी सादर केल्या. तसेच रिल्स स्टार विशाल पिसाट यांनी सोशल मीडियावर गाजलेल्या त्यांच्या अनेक रिल्स मधील कला आपल्या विनोदी शैलीने सादर केल्या. आणि प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.




# कांद्याच्या पानांची भाजी खाल तर कोलेस्टेरॉल सर्रकन वितळेल

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक –** हिरवा कांदा, कांद्याची पात किंवा पातीचा कांदा अशा अनेक नावांनी ही भाजी ओळखली जाते. तुमच्या जवळच्याच मार्केटमध्ये सहज मिळणारी ही भाजी अगदी स्वस्त दरात मिळते. कांद्याच्या पातीचे अनेक फायदेही आहेत.




या भाजीत असलेल्या अँटी-हायपरलिपिडेमिक गुणधर्मांमुळे, ते खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. ज्यामुळे हृदय निरोगी राहण्यास मदत होते. कोलेस्टेरॉलसोबतच ते रक्तातील साखर कमी करण्यासही उपयुक्त आहे. फायबर भरपूर असल्याने ते पचनासाकांद्याच्या पातीत दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे आरोग्यासाठी देखील फायदेशीर मानले जाते. व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के देखील हिरव्या कांद्यामध्ये आढळतात, जे आपल्या प्रतिकारशक्ती आणि मजबूत हाडांसाठी आवश्यक आहेत.

कांद्याच्या पातीत दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे आरोग्यासाठी देखील फायदेशीर मानले जाते. व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के देखील हिरव्या कांद्यामध्ये आढळतात, जे आपल्या प्रतिकारशक्ती आणि मजबूत हाडांसाठी आवश्यक आहेत. जर तुम्हाला फक्त एका भाजीचे इतके फायदे मिळत असतील तर त्याचा आहारात समावेश करणे खूप फायदेशीर ठरू शकते. कांद्याच्या या भाजीला तुम्ही अनेक प्रकारे तुमच्या आहाराचा भाग बनवू शकता.कांद्याच्या पातीत दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे आरोग्यासाठी देखील फायदेशीर मानले जाते. व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के देखील हिरव्या कांद्यामध्ये आढळतात, जे आपल्या प्रतिकारशक्ती आणि मजबूत हाडांसाठी आवश्यक आहेत.

जर तुम्हाला फक्त एका भाजीचे इतके फायदे मिळत असतील तर त्याचा आहारात समावेश करणे खूप फायदेशीर ठरू शकते. कांद्याच्या या भाजीला तुम्ही अनेक प्रकारे तुमच्या आहाराचा भाग बनवू शकता.

# हिवाळ्यात रूम हीटर जपून वापरा; तुमची एक चूक पडू शकते महागात

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** हिवाळा सुरु झाला आहे. त्यानुसार हवेतही गारवा जाणवू लागला आहे. अशा परिस्थितीत लोकांनी आपल्या घरांसाठी रूम हिटर वापरायला सुरुवात केली आहे. थंडीच्या वातावरणात रूम हीटरचा वपर मोठ्य प्रमाणात केला जातो. पण, तुम्हाला माहीत आहे का या रूम हिटरचे जितके फायदे आहेत तितकेच त्याचे तोटेही आहेत. म्हणजेच रूम हिटर चुकूनही रात्रभर चालू ठेवू नये. नाहीतर तो जीवघेणा ठरू शकतो. तसेच, गेल्या काही वर्षांत रूम हिटरमुळे मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे सावधगिरी बाळगणं गरजेचं आहे.



हिवाळ्यात रूम हीटर जपून वापरा तज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात रूम हीटर जपून वापरावे. रूम हीटर फक्त कमी कालावधीसाठी चालवावे. रात्री हीटर लावून झोपण्याची चूक कधीही करू नये. अन्यथा ते जीवघेणेही ठरू शकते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर एखाद्या खोलीतील वायुवीजन योग्य नसेल तर रात्रभर हीटर चालवल्याने खोलीत कार्बन मोनोऑक्साइड वायू भरतो आणि ऑक्सिजन कमी होऊ शकतो. अशा स्थितीत झोपेत असतानाही श्वासोच्छवास बंद होऊ शकतो. त्यामुळे अशा चुका करणे टाळावे. रूम हीटरचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी ह्युमिडिफायरचा वापर केला जाऊ शकतो. दमा आणि श्वसनाच्या रुग्णांनी शक्य तितक्या कमी प्रमाणात हीटर चालवावा.

**रूम हीटर वापरण्याचे ५ तोटे**

१. तज्ज्ञांच्या मते, रूम हीटर खोलीतील हवा कोरडे करण्याचे काम करते, ज्यामुळे त्वचा कोरडी होऊ शकते. आधीच कोरडी त्वचा असलेल्या लोकांनी रूम हीटर पूर्णपणे टाळावे.

२. रुम हीटर जास्त चालवल्याने डोळ्यांवरही परिणाम होतो. यामुळे डोळ्यांमध्ये कोरडेपणा आणि जळजळीची भावना होऊ शकते. असे झाल्यास, हीटर ताबडतोब बंद करा.

३. काही लोकांना रूम हीटरची ॲलर्जी देखील असते. त्यातून बाहेर पडणाऱ्या गरम हवेमुळे नाकही कोरडे होऊ शकते.

४. दमा किंवा श्वसनाच्या रुग्णांनी रूम हीटरमध्ये जास्त वेळ राहू नये. अन्यथा खोलीतील ऑक्सिजनची पातळी कमी होऊ शकते, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. रूम हीटरमधून निघणारा कार्बन मोनोऑक्साइड वायू आरोग्यासाठी धोकादायक असतो. यामुळेच रूम हीटरचा दीर्घकाळ वापर टाळावा.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# शेतकऱ्यांनो, पिकांची काळजी घ्या, ५ दिवस ढगाळ; शेतातील पिकांवर फवारणी टाळा

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूरच्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार पुढील पाच दिवस म्हणजे ५ ते ९ डिसेंबरदरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचीही शक्यता अधिक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापणीला आलेला माल सुरक्षित ठेवण्याचे व शेतातील पिकांवर फवारणी टाळण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

मंगळवारी सकाळपासून आकाश पूर्णपणे ढगांनी व्यापले असून वातावरणात गारवा वाढला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार ६ व ७ डिसेंबरला हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता आहे. त्यानंतर दोन दिवस वातावरण कोरडे राहण्याची शक्यता आहे.



शेतकऱ्यांनी पावसाचा अंदाज लक्षात घेता आंतरमशागतीची कामे, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, तसेच उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे २-३ दिवस पुढे ढकलावी, असा सल्ला कृषी विभागाने जारी केला आहे. परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी व मळणी करून शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवावा. मळणीची कामे शक्य नसल्यास आणि परिपक्व अवस्थेतील कापणी केलेले धान पिक शेतात पसरून ठेवले असल्यास शेतामध्ये उंचवटा असलेल्या ठिकाणी गोळा करून कापणी केलेला शेतमाल प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थीतीचा अंदाज घेऊन कापूस वेचणी सुरु ठेवावी. वेचणी तसेच वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकी साठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. वेचणी केलेला कापूस कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. गहू, मोहरी, जवस, फळबागा तसेच भाजीपाला पिकामध्ये ओलित करणे २ ते ३ दिवस पुढे ढकलावे. पावसाचा अंदाज लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती मधील खरेदीदार व इतर शेतमाल खरेदीदारांनी शेतकऱ्यां द्वारा विक्रीसाठी आणलेला शेतमाल उघड्या जागेवर व न ठेवता शेड मध्येच साठवावा, अशी सुचनाही विभागाने दिली आहे.

### किडीचा प्रादुर्भाव वाढला

दरम्यान गेल्या दोन दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणामुळे शेतातील पिकांवर किडीचा प्रादुर्भाव वाढला आहे. सध्या रबी हंगामातील गहु, हरभरा, तुर, मोहरी, जवस, फळबागा शेतात आहेत. या पिकांवर किडीचा हल्ला होत असल्याने शेतकऱ्यांसमोर संकट आहे.

# आदिवासींच्या साडेबारा हजार पदभरतीचा शासनाला विसर; रिक्त पदे भरणार केव्हा?

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेत गैरआदिवासींनी बळकावलेली आदिवासी समाजासाठी राखीव असलेली तब्बल १२ हजार ५०० पदे भरण्यासाठी खुद्द शासनानेच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात प्रतिज्ञापत्र दिले होते. ही पदे ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रिकामी करून भरण्यात येणार होती; परंतु मार्च २०२० च्या शेवटच्या आठवड्यात कोरोनाचा प्रादुर्भाव उद्भवल्याने ही प्रक्रिया रखडली आहे, हे विशेष.




सेंख

न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये ६ जुलै २०१७ रोजी ऐतिहासिक न्यायनिर्णय दिलेला आहे. तद्अनुषंगाने या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर याचिका क्र.३१४०/२०१८ याप्रकरणी शासनाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

आदिवासी समाजाची विशेष पदभरती होत नसल्यामुळे विधानसभा, विधान परिषदेमध्ये वारंवार तारांकित, लक्षवेधी प्रश्न उपस्थित होऊन चर्चा झाली. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी लेखी हमी दिली होती.

त्यानंतही पदभरती झाली नाही. शासन निर्णय काढून एक वर्ष उलटले, ३१ जुलै २०२३ रोजी डेडलाइनही संपून गेली आहे. तरीही जाहिरातींचा पत्ताच नाही.

### आमच्यावरच अन्याय का?

गेल्या चार दशकांपासून आदिवासी समाजाच्या घटनात्मक हक्काच्या राखीव जागा बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे गैरआदिवासींनी बळकावलेल्या आहेत. बेरोजगार तरुण युवक-युवती नोकरीसाठी तडफडत आहे. विशेष पदभरती मोहीम राबविण्यात यावी. **– डॉ. प्रमोद घोडाम,** संस्थापक अध्यक्ष, ट्रायबल फोरम

# कापूसतळणी - खल्लार मार्गाकडे कोणी लक्ष देईल का ?
## नागरिकांचा सवाल, मार्गात पडले खड्डेच खड्डे

**दि.६विदर्भ प्रजासत्ताककापूसतळणी** येथील इंदिरा नगराजवळील खल्लार मार्गावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडलेले असल्याने दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या मार्गाने दुचाकी वाहन चालक व मोठ्या वाहनांना ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. शिवाय अपघातसुद्धा घडत आहेत. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती करून ही समस्या तत्काळ मार्गी लावण्यात यावी, अशी मागणी सर्व स्तरावरून होत आहे.

खल्लार मार्गावरून अंजनगावसुर्जी- कापूसतळणी- कोकर्डा मार्गे दर्यापूर तसेच खल्लारमार्गे अमरावती एसटी बसेसचे येणे-जाणे सुरू आहे. या मार्गावरून संजीवन विद्यामंदिर, निर्मला विद्यालय, हैदरिया उर्दू हायस्कूल, तैबा उर्दू ज्युनिअर कॉलेज, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, बालवाडीचे विद्यार्थी शाळेत पायदळ जाताना या



रस्त्यावरील खड्ड्यांतून रस्ता पार करीत पुढे जाणाऱ्या वाहनाने या खड्ड्यातील घाण पाणी त्यांच्या अंगावर उडते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कपडे घाणीने खराब होतात. अशावेळी घाणीने भरलेल्या कपड्यांसह वर्गात बसावे लागते किंवा गणवेश बदलविण्याकरिता घरी परत जाण्याचा त्यांच्यावर प्रसंग येतो. त्याकारणाने त्यांना फार त्रास सहन करावा लागतो.

या मार्गाची दुरवस्था झाल्याने अपघातसुद्धा होत आहेत. याच मार्गावर हिंदू स्मशानभूमी आहे. पावसाळ्यात याच खड्ड्यांतून शवयात्रा काढावी लागते. या मार्गावर एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता टाळता येत नाही. अशी भयावह परिस्थिती असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गाची समस्या तत्काळ मार्गी लावावी, अशी मागणी सर्व स्तरावरून होत आहे तर नेत्यांनी सुद्धा यात लक्ष घालावे अशी मागणी सामान्य नागरिक करीत आहे.

# उत्तमसरा येथे भातकुली तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी
## ७ व८ डिसेंबरला आयोजन

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक भातकुली –** शिक्षण विभाग पंचायत समिती भातकुली, तालुका मुख्याध्यापक संघ, विज्ञान अध्यापक मंडळ व जि.प.माध्यमिक शाळा उत्तमसरा यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व८डिसेंबरला उत्तमसरा येथे ५१ वी भातकुली तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. विदयार्थामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वृध्दिंगत व्हावा तसेच त्यांच्या वैचारिक कौशल्याला वाव मिळावा,या उद्देमाने विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनात बाल वैज्ञानिकांनी तयार केलेल्या प्रतिकृती सादर होणार आहे.या प्रदर्शनीचे उद् घाटन गुरुवार दि.७ ला सकाळी ११वाजता भातकुली पं.स.चे गटविकास अधिकारी डॉ.प्रफुल्ल भोरखडे यांच्या हस्ते होणार असुन या कार्यक्रमाचे अध्यक्ष उत्तमसराचे सरपंच धमेंद्र मेहरे राहणार आहे.प्रमुख अतिथी सहाय्यक गटविकास अधिकारी प्रल्हाद तेलंग,गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे,शा.पो.आ.अधिक्षक नरेंद्र गायकवाड,शिक्षण विस्तार अधिकारी संतोष घुगे,केंद्रप्रमुख निता सोमवंशी,भातकुली तालुका मुख्या.संघाचे अध्यक्ष




गजानन लेंडे,उपसरपंच सौ.संगिता मानकर,शा.व्य.समिती अध्यक्ष प्रविण शेवतकर,कैलास रंगारी आणि सदस्य उपस्थितीत होणार आहे.दुपारी अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे जिल्हासचिव हरिष केदार यांचे अंधश्रध्दा निर्मूलनावर जनजागृतीवर व्याख्यान होणार आहे.नंतर सर्वांन करीता विज्ञान प्रदर्शनी पाहण्या करीता खुली होणार आहे. शुक्रवार दि.८डिसेंबरला दुपारी २वाजता या प्रदर्शनीचा समारोप व बक्षिस वितरण सोहळा होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच सौ.संगिता मानकर ह्या राहणार असुन प्रमुख अतिथी शास्त्रज्ञ डॉ.महेंद्रकुमार रॉय तर प्रमुख पाहुणे गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे, संतोष घुगे,नरेंन्द गायकवाड, निता सोमवंशी, गोपाल वडतकर,श्रीकृष्ण ठाकरे, कु.श्वेता पांडे,श्रीमती मिनाश्री इंगळे उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन जि.प. माध्यमिक शाळा उत्तमसराचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, सहा.शिक्षक संतोष कुर्हेकर, अश्विनी झाडे, शितल भोपाळे, उमेश बसरे, प्रतिभा नांदणे, जोत्स्ना हायगले, मिनाक्षी इंगळे, गजानन येलोणे, राजेश सावरकर,भूषण बुरंगे, दिपा गजघाटे आणि शिक्षण विभाग पंचायत समिती भातकुली यांनी केले आहे.

# आंतरराज्यीय टोळीचे ४ आरोपी जेरबंद
## खोलापुरी, येवदा, भातकुलीमध्ये शटर तोडून दुकानात चोरी



**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** बंद दुकानाचे शटर वाकवून चोरी करणारी आंतरराज्यीय टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद करण्यात आली. यामध्ये चार जणांचा समावेश असून, त्यांनी अमरावती जिल्ह्यातील खोलापुरी, भातकुली व येवदा भागात गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये नवलसींग जुवानसींग भुरीया (वय ४० जिल्हा धार ह.मु चोईथराम मंडी इंदोर (मध्यप्रदेश), विरेंद्र शोभाराम नागेश्वर, (४०, रा. गोलखेडा, बु- हाणपुर) रामकीसन मुनसीशिलवेकर, (३६ वर्ष, बु-हाणपुर) राजू रामदिल जांभेकर, (३२ वर्ष रा. गोलखेडा, बु-हाणपुर) यांचा समावेश आहे. अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात बंद दुकानाच्या शटर वाकवून चोरी करण्याता आल्याच्याघटना घडल्या होत्या. अशाप्रकारचे गुन्हे उघडकीस ग्रामीण पोलिस अधिक्षकांनी निर्देश दिले होते. त्याखोलापुर, येवदापोलिसस्टेशनलाहे गुन्हे नोंद करण्यात आले होते. या घटनांचा स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण पथकाकडून समांतर तपास करण्यात आला. घटनेचे सिसिटिव्ही फुटेजची पाहणी करुन गुन्हे करणारी टोळी ही लेक पॅलेस कॉलनी, झोपडपट्टी इंदोर (मध्यप्रदेश) येथील असल्याचे समजले. स्थानिक गुन्हे शाखापथक इंदोर येथे रवाना होवून सिसिटिव्ही फुटेजमधील इसमाची विचारपुस केली. हा इसमनवलसींगजुवानसींग भुरीया असल्याचे निष्पन्न झाले. अत्यंत शिताफीने नवलसींग जुवानसींग भुरीयायासताब्यात घेण्यात आले. त्याने हा गुन्हा त्याचे तीन साथीदार विरेंद्र शोभाराम नागेश्वर, रामकीसन मुनसी शिलवेकर, राजू रामदिलजांभेकर यांचे मदतीने केल्याचे सांगितले.ही कार्यवाही पोलीस अधीक्षक, – विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांचे मार्गदर्शनाखाली, किरण वानखडे, यांचे नेतृत्वात – संजय शिदे, त्रंबक मनोहर, सुनिल महात्मे, सैय्यद अजमत, सुधीर बावणे, निलेश डांगारे, अमोल केंद्रे, सागर धापड, रितेश वानखडे, संजय गेठे यांनी केली.

# तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या
## युवक काँग्रेस आक्रमक ; तहसीलदारांना दिले निवेदन

**दि.६विदर्भ प्रजासत्ताकतिवसा–** तिवसा तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परंतु अजूनपर्यंत शासनाकडून नुकसानीचे पंचनामे करण्यात आले नाही, तरी नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, यासाठी तिवसा युवक कॉंग्रसच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

तिवसा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे कपाशी, तूर, चणा, संत्रा, भाजीपाला, कांदा यासारख्या पिकांचे



अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे. इतके नुकसान होऊन सुद्धा शासनाने जाणूनबुजून अमरावती जिल्हा हा नुकसानग्रस्तांच्यायादीतून वगळण्यात आल्या आरोप शेतकऱ्यांचा आहे. तथापि, शासनाने शेतक-यांचा अंत न पाहता तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा आम्ही सर्व शेतक-यांसह रास्तारोको आंदोलन करू, असा इशारा युवक काँग्रेसचे जसबीर ठाकूर यांनी दिला. त्यावेळेला अनकवाडी गटग्रामपंचायतचे सरपंच सूरज धूमनखेडे, मोझरीचे उपसरपंच प्रशांत प्रधान, कुउबासचे मनोज साबळे, अँड. विकास तुरकाने, आशिष बायस्कर, स्वप्नील तुरकाने, विवेक साबळे, गुड्डू बायस्कर, पंकज कळवे, अझहर शहा, प्रफुल्ल लोमटे, सागर राघोतें, प्रफुल्ल फटिंग, फिरोज शेख, बंटी वानखेडे, बंटी नरोडे, अंकुश बायस्कर, प्रवोण बारी, रूपेश घूमनखेडे आदी शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते.

# लिव्ह-इन संस्कृतीवर प्रकाश टाकणारी 'भुल भिंगरी'

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** मराठी रंगभूमीला एक ठोस अधिष्ठान देणा-या अमरावती नगरीत ६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमीक फेरीला रसिकांच्या भरगच्च प्रतिसादात सुरवात झालीअसून आज दि. ५ रोजी रजनिश जोशी लिखित व डॉ. अनंत देव आणि मनोज उज्जैनकर दिग्दर्शित 'भुल भिंगरी' या युवाजागर कला केंद्र , अमरावती निर्मित सामाजिक नाटकाने स्पर्धेचा प्रारंभ झाला केवळ दोन पात्रांच्या सहभागाने सादर झालेले हे नाटक सुखी जीवन जगण्यासाठी माणूस करीत असलेला संघर्ष, अधिक पैसा व केवळ पैसा कमविण्याच्या नादात झालेले कौटुंबिक दुर्लक्ष, संघर्षात आलेले अपयश, त्यातून निर्माण झालेली विमनस्कता, अखेर कोलमडलेली विवाहसंस्था 'भुल भिंगरी'च्या माध्यमातून लेखकाने मांडली आहे. विवाहसंस्थेला नाकारून आजच्या लिव्ह-इन



संस्कृतीला अंगीकारुन जगण्याच्या पद्धतीवर ही संहिता आधारित आहे. लिव्ह-इन रिलेशनशिप मध्ये राहणारे जोडपे लिनी (संपदा बनसोड) व जय (अतुल घुले) आपल्या संबंधाचा दहावा वाढदिवस साजरा करण्याच्या दृष्याने होते. यावेळी त्यांच्यात होणारा लडिवाळ संवादाने या नाटकाची सुरवात होते. कथानक मध्यमगतीने पुढे जात असतांना लग्नासाठी लिनीने लावलेला तगादा, आई होण्याची मांडलेली भावना व त्याला जयने जीवनात सक्षमपणे उभे राहण्याच्या सबबीवर केलेली टाळाटाळ दिग्दर्शकाने दोन्ही पात्रांकडून रंगमंचावर सादर करुन घेतली आहे. पूर्वार्धात जय खोटे बोलुन मोठी नोकरी मिळवून यशस्वी झालेला दाखवीत असतांनाच आपल्या महत्वाकांक्षेपायी लिनीकडे त्याचे होत असलेले दुर्लक्ष, यातून तिची होणारी भावनिक तगमग व त्यातून निर्माण होणारा दोघातील संघर्ष ही या नाटकातील मध्यवर्ती कथा आहे.हिमांशू अहिरे यांची प्रकाश योजना, मनोज उज्जैनकर यांचे पार्श्व संगीत आणि दिग्दर्शन नाटकातील प्रसंगांशी सुसंगत होते. डॉ. श्याम देशमुख यांचे नेपथ्य संहितेला सुसंगतच होते. रंगभूषा रिया भुयार तर वेषभुषा सारिका उज्जैनकर यांची होती. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात ही स्पर्धा सूरू आहे. अमरावती केंद्रावर सुरु असलेल्या या प्राथमिक फेरीत आज दि. ६ डिसेंबर रोजी कलादर्पण बहूउद्देशीय संस्था, अमरावती निर्मित, रमेश पवार लिखित आणि सागर रघुवंशी दिग्दर्शीत *पब्लिक शिट्टी * हे नाटक संत ज्ञानेश्वर संस्कृतीक भवन येथे सायंकाळी ठीक ७.०० वाजता सादर होईल. रोजच्या प्रमाणे रसिकांनी वेळेवर उपस्थित राहावे अशी विनंती स्पर्धा समन्वयक ऍड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक विशाल फाटे व श्रद्धा पाटेकर यांनी केले आहे.

# अचलपूर बाजार समितीत अडीच कोटीचा घोटाळा, २२ जणांना नोटीस

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर, –** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत २०२०-२१ आणि २०२१-२२ या दोन वर्षांच्या वैधानिक लेखा परीक्षणात विशेष लेखा परीक्षकांना कोट्यवधी रुपयांची आर्थिक अनियमितता आढळून आली आहे. यात जवळपास अडीच कोटी रुपये वसूल पात्र दाखविण्यात आले आहेत.

वैधानिक लेखा परीक्षणात आढळलेल्या त्रुटी-दोषांच्या अनुषंगाने विशेष लेखा परीक्षक व्ही. एस. मसराम यांनी तत्कालीन सभापती, उपसभापतींसह १८ संचालकांना आणि सचिव, रोखपाल, सहायक सचिव, विभाग प्रमुख व लेखापाल यांना २४ नोव्हेंबरला नोटीस पाठविल्या आहेत. या नोटीस २ डिसेंबर रोजी संबंधितांना पोहोचत्या झाल्या. आढळून आलेल्या त्रुटी-दोषांच्या अनुषंगाने या सर्वांकडून सात दिवसांच्या आत खुलासा मागविण्यात आला आहे. लेखा परीक्षणा दरम्यान अनेक व्हाऊचर विनासहीचे आढळून आले आहेत. यातील काही व्हाऊचरची नोंद कॅशबुकलाही घेतली गेलेली नाही. या व्हाऊचरच्या अनुषंगाने नोटशीट नाही, सभेत मंजुरीही नाही.उपसमितीसह सर्व साधारण सभेचा ठराव नाही. त्यावर सचिव आणि सभापतींची स्वाक्षरी नाही. रोखीने आलेल्या पैशाची रोखीनेच विल्हेवाट लावण्यात आली आहे. सन २०२०-२१, २०२१- २२ मध्ये धान्यावरील बाजार फी व सुपरव्हिजन फी या अनुषंगाने २८ लाख, तर दुकान गाळे भाडे अनुषंगाने २८. ४७ लाख, असे एकूण ५६ लाख ४७ हजार ६९० रुपये वसूलपात्र दाखविले आहेत. कापसाचा सेस नगण्य म्हटले आहे. व्हाऊचरच्या माध्यमातून रोखीने खर्च दाखविलेले १ कोटी ८३ लाख ३७ हजार ९१० रुपये वसूलपात्र रक्कम असल्याचे लेखापरीक्षकांनी म्हटले आहे.

### २२ जणांना नोटीस

सन २०२०-२१ व २०२१-२२ च्या वैधानिक लेखा परीक्षणात लेखा परीक्षकांना त्रुटी-दोष आढळून आले. या त्रुटी-दोषांच्या अनुषंगाने लेखा परीक्षकांनी तत्कालीन संचालक मंडळ आणि सचिव, रोखपाल, सहायक सचिव, विभाग प्रमुख आणि लेखापाल अशा एकूण २२ जणांकडून खुलासा मागविला आहे.

**– अमर वानखडे,** सचिव, अचलपूर बाजार समिती



### मृताच्या नावेही नोटीस

लेखापरीक्षणादरम्यान लेखा परीक्षकांना आढळलेल्या त्रुटी-दोषांच्या अनुषंगाने लेखापरीक्षकांनी तत्कालीन सचिव आणि आता हयात नसलेले पवन सार्वे यांच्याही नावे नोटीस काढून खुलासा मागविला आहे. २ डिसेंबरला निधन झालेले तत्कालीन संचालक विजय काळे यांच्याही नावे नोटीस काढण्यात आली.

# १ कोटी पुरुषांची आरोग्य तपासणी; 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' अभियान

### अभियानांतर्गत राज्यातील सुमारे ४ कोटी ६७ लाख लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई –** सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १८ वर्षांवरील पुरुषांच्या सर्वांगीण आरोग्य तपासणी सप्टेंबर महिन्यात 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' अभियानातंर्गत सुरु करण्यात आली आहे. आतापर्यंत १ कोटी पुरुषांच्या मोफत आरोग्य तपासणीचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे ४ कोटी ६७ लाख लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत ४ डिसेंबर २०२३ पर्यंत १८ वर्षांवरील १ कोटी ७२ हजार पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यापैकी ९२ लाख लाभार्थ्यांच्या आवश्यक त्या चाचण्या आरोग्य संस्थांमध्ये करण्यात आलेल्या असून त्यापैकी सोळा लाख लाभार्थ्यांना औषधोपचार देण्यात आलेले आहेत. सुमारे तेरा हजार लाभार्थ्यांवर लहान-मोठ्या शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. ही मोहीम ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू राहणार असून त्यानंतर गरजेनुसार मोहिमेचा कालावधी वाढवण्याचा निर्णय घेतला जाणार आहे.



आरोग्यवर्धिनी केंद्र उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी भागातील सामुदायिक आरोग्य केंद्र, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय या स्तरावर रुग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये १८ वर्षे वरील पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक चाचण्या, गरजेनुसार ईसीजी, सिटीस्कॅन, एक्स-रे इत्यादी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत आणि गरजेनुसार रुग्णांना आवश्यक शस्त्रक्रिया सार्वजनिक जारोग्य विभाग अंतर्गत रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.

त्याचप्रमाणे, गरजेनुसार रुग्णांना मोठ्या शस्त्रक्रियांसाठी वैद्यकीय महाविद्यालय व शासन मान्य महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत नोंदणीकृत केलेल्या रुग्णालयांमध्ये संदर्भित केले जाणार आहे. तसेच 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' या अभियानासाठी विशेष ॲपची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर ॲपच्या माध्यमातून सर्व आरोग्य केंद्राच्या ठिकाणी आरोग्य कर्मचारी तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत रुग्णांची नोंदणी, त्यांना दिलेले औषध उपचार तसेच करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया, करण्यात आलेल्या चाचण्या, या माहितीची नोंद त्या ठिकाणी केली जाते.

# शिवमहापुराण कथा मंडपाचे थाटात भूमिपूजन

## १६ डिसेंबरपासून होणार सुरुवात

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक हनुमान गढी अमरावती–** हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्ट, आमदार रवी राणा, खासदार नवनीत राणा, मुख्य नियोजक चंद्रकुमार जाजोदीया यांच्या मार्गदर्शनात विविध समितीचे सदस्य जोमाने कार्यरत आहेत. हनुमान गढी छत्रीतलाव रोड येथे १०० एकर परिसरात हा भव्य दिव्य मंडप उभारला जात आहे. ५ लाख लोकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.



मंडप उभारणीचे काम आजपासून जोरात सुरू झाले. यावेळी शक्ती महाराज, साई राजेश लाल, साई संतोष कुमार, सुनील राणा, नीलकंठ कात्रे, अनिल अग्रवाल, चंदू सोजतिया, पवन जाजोदीया, जयंत वानखडे, अचीत जाजोदिया, प्रा. अजय गाडे, अजय मोरया, कमलकिशोर मालानी यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी सुधा तिवारी, ज्योती सैरीसे, सुमती ढोके यांच्यासह जितु दुधाने, वीरेंद्र उपाध्याय, नितीन बोरकर, शैलेंद्र कस्तुरे, मिलिंद कहाळे आदींनी उपस्थितांना संबोधित करून संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगितली. १५ डिसेंबर रोजी जिल्हा स्टेडियम येथून हनुमान गढी पर्यंत १ लाख महिलांची भव्य कलशयात्रा यात्रा दुपारी १२.३० वाजता प्रारंभ होणार आहे.

# अधिवक्ता संशोधन कायद्याला खा. नवनित राणांचा पाठिंबा

### जलद- सुलभ व गतिमान न्यायासाठी आवश्यक मध्यस्त-दलालांकडून गोरगरीबांची फसवणूक

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** केंद्रीय कायदे व न्याय मंत्री अर्जुन मेघवाल यांनी लोकसभेत मांडलेल्या अधिवक्ता (वकील) संशोधन विधेयकाला खा. नवनीत रवी राणा यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

गोरगरीब, अशिक्षित व आणि गरजू लोकांना जलद् सुलभ व गतिमान न्याय मिळण्यासाठी आणि त्यांना थेट मध्यस्ताशिवाय वकीलासोबत संपर्क साधता यावा व दलाल किवा मध्यस्थ त्यांना लुटू किवा फसवू नये यासाठी हे विधेयक आवश्यक असल्याचे खा. नवनीत रवी राणा यांनी संसदेत स्पष्ट केले. आपल्या अमरावती जिल्ह्यातील मेळघाट सारख्या अतिदुर्गम भागातून शेती, वने किवा कौटुंबिक वाद यासारख्या अनेक खटल्यासाठी १५० किमी दूर यावे लागते, गोरगरीब नागरिक आपली मजुरी रोजगार सोडून मजबुरीने न्यायासाठी न्यायालयात चकरा माराव्या लागतात. या ठिकाणी असणारे दलाल, मध्यस्थ त्यांना थेट वकिलांना भेटू देता त्यांची लूट करतात आणि न्याय मिळेपर्यंत होणारा विलंब या मुळे त्यांना आपली मालमत्ता, शेती जमीन



विकण्याची पाळी येते व ते कंगाल होतात त्यामुळे वकील व पक्षकार यांच्यात कोणी मध्यस्थ नसावे आणि त्यांच्यात थेट संवाद व्हावा यासाठी हे विधेयक आवश्यक असल्याचे प्रतिपादन खासदार सौ.नवनीत रवी राणा यांनी केले कौटुंबिक खटल्यात हे मध्यस्थ महिलांची दिशाभूल करतात, त्यांना वारंवार कोर्टात चकरा माराव्या लागतात व वकिलांची भेट होवू देत नाहीत, काही गरीब महिलांकडे पैसे पण नसतात त्यावेळी कदाचित या महिलांचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे प्रतिपादन खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी लोकसभेत केले.मोदी सरकार हे गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी कटिबध्द असल्याचे सांगून देशाचे यशस्वी पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी हे विकसित भारताचे स्वप्न बघून प्रत्येक समजातील वंचित घटकांना न्याय मिळावा यासाठी हे विधेयक अत्यंत आवश्यक होते आणि आपण या विधेयकाला पाठिबा देत असल्याचे प्रतिपादन खासदार सौ नवनीत रवी राणा यांनी यावेळी सभागृहात केले.

# चांदूरबाजार तालुक्यातील २ हजार २६२ शेतकरी अनुदानापासून वंचित

## अकराशे लाभार्थी अस्तित्वातच नाहीत

**दि.६विदर्भ प्रजासत्ताकचांदूरबाजार :** पीएम किसान सन्मान योजनेमध्ये ई-केवायसी करण्यासाठी तब्बल पाच वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही ती न केल्याने चांदूरबाजार तालुक्यातील २ हजार २६२ शेतकऱ्यांना या लाभापासुन वचित राहावे लागणार आहे. यातील ११०० शेतकरी मयत असल्याची माहीती तालुका कृषी कार्यालयाने दिली. तर त्यांना आता राज्य सरकारच्या नमो किसान सन्मान योजनेच्या लाभापासुनही बचित राहावेलागण्याची शक्यता आहे. कृषी विभागाने या शेतकऱ्यांची नावे वगळण्याच्या प्रक्रियेला सुरवात केली आहे. पीएम किसान योजनेत पात्र शेतकऱ्यांना दर चार महिन्यांनी दोन हजार रुपयाच्या लाभ दिल्या जातो. या योजनेचे १४ हप्ते आता पर्यंत शेतकऱ्यांना वितरीत झाले आहेत. या योजनेत बरेच अपात्र शेतकरीही आढळले असल्याने



त्यांना देण्यात येणारा लाभ थांबवुन वितरीत झालेला लाभ वसुल करण्यात येत आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी व आधार कार्ड लिंक करणे बंधनकारक आहे. यासाठी शासनाने तब्बल पाच वेळा मुदतवाढ दिली आहे. ही योजना आता कृषी विभागाकडे सोपविण्यात आल्यानंतर कृषी विभागाने लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी करावी व आधार कार्ड करण्यासाठीगावपातळीवर शिबिरे घेतली. चांदूरबाजार तालुक्यात नोंदणी करण्यात आलेल्या एकूण शेतकऱ्यांपैकी २ हजार २६२ लाभार्थ्यांनी वारंवार सुचना देऊन व आवाहन करुन सुध्दा प्रतिसाद दिला नाही. परिणामी त्यांचे ई-केवायसीच्या यादीत येऊ शकलेले नाही. आता या खातेदार शेतकऱ्यांची नावे वगळण्याशिवाय पर्याय नसल्याचे तालुका कृषी अधिकारी शिवाजी दांडेगावकर यांनी सांगितले. त्यामुळे या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासन या दोन्ही शासनाच्या किसान सन्मान योजनेच्या या दुहेरी लाभापासून बंचीत राहावे लागणार आहे,

# तळेगाव दशासर शंकरपट तयारीला सुरवात

## कृषक सुधार मंडळाची बैठक

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक तळेगाव दशासर,–** संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या तळेगावचा शंकरपट यावर्षी सुद्धा पूर्वी प्रमाणेच १५ जानेवारीपासून सुरू होणार आहे. स्व. नानासाहेब देशमुख यांनी सुरू केलेला हा शंकरपट स्व. बापूसाहेब देशमुख यांनी चालविलेला तसेच या परंपरेत भर टाकत रावसाहेब देशमुख यांनी महिला पटाची सुरवात केली. सध्या कृषक सुधार मंडळाचे शिवाजीराव देशमुख यांच्या मार्गदर्शनात कृषक सुधार मंडळाचे सदस्य, कार्यकर्ते, स्वयंसेवक गावकरी मंडळी सुद्धा मोठ्या जोमाने तयारीला लागली असून त्यानिमित्ताने कृषक सुधार मंडळाच्या



सदस्यांची बैठक देशमुख यांच्या वाड्यात आयोजित करण्यात आली होती. तळेगाव शंकरपटात महाराष्ट्राच्या विविध भागातून बैलजोड्या भाग घेण्यासाठी येतात. एकंदरीत मोठे आयोजन येथे करण्यात येते. त्यामुळे मोठ्या तयारीची सुद्धा गरज असते. या अनुषंगाने विविध विभाग करून कामाची विभागणी कृषक सुधार मंडळाच्या कार्यकर्त्यांना करून दिली व कार्यकर्ते सुद्धा ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी प्रयत्नरत आहेत.यावेळी कृषक सुधार मंडळाचे सचिव आनंद देशमुख, सुयश देशमुख, रवी चुटे, पोमेश थोरात, माणिक बगाडे, रामप्रसाद चन्नव, नरेंद्र रामावत, डॉ. विनोद देशमुख, अशोक गायकवाड, पंकज गायकवाड, श्याम घाटे, प्रशांत साखरकर, गोविंद कामडी, पंकज देशमुख, संजय हागे, गुणवंत झिटे, किशोर मेश्राम, वाढोणा येथील सरपंच प्रशांत हुडे, विवेक सराफ, राजू नागरीकर, दिवाकर ठाकरे आदी उपस्थित होते.




# शिंदे-फडणवीस सरकारला घेरण्यासाठी ठाकरेंचा प्लॅन तयार



**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

ज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनास उदयापासून नागपुरात सुरुवात होणार आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मोठ्या घोषणांची शक्यता आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने येण्याची चिन्हे आहेत.या हिवाळी अधिवेशनात शिवसेना ठाकरे गट राज्य सरकारला घेरण्याच्या तयारीत आहे. उद्धव ठाकरेंनी पक्षाच्या सर्व आमदारांना अधिवेशनासाठी विशेष सूचना दिल्या आहेत सत्ताधारी त्यांना कसे उत्तर देतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे

उद्धव ठाकरेंनी दिल्यात पक्षाच्या सर्व आमदारांना अधिवेशनासाठी विशेष सूचना दिल्या आहेत. अधिवेशनात शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने उपस्थित केले जाणार आहे. राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे अधिवेशनामध्ये सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर ठाकरे गट आपली ठाम भूमिका मांडणार आहे. शेतकऱ्यांचा झालेले नुकसान राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले जाणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या पीक विमा संदर्भात सरकार प्रश्न उपस्थित केले जाणार आहेत.

### मुंबईतील आमदार मुंबईतील सर्वसामान्यांचे प्रश्न उपस्थित करणार

मुंबईतील आमदार मुंबईतील सर्वसामान्यांचे प्रश्न उपस्थित करणार आहेत. मुंबईतील आमदारांना सामान्य नागरिकांच्या समस्यावर आणि विशेष करून मुंबईतील उद्धवणाऱ्या समस्यांवर प्रश्न उपस्थित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुंबई महापालिकेचा रस्ते काँक्रिटीकरण घोटाळा, फर्निचर घोटाळा व इतर काही महत्त्वाचे घोटाळे समोर आणून राज्य सरकार समोर प्रश्न उपस्थित केले जातील.

### धारावी पुनर्विकास प्रकल्पाला कडाडून विरोध केला जाणार

धारावी पुनर्विकास प्रकल्पाला कडाडून विरोध केला जाणार आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानी समूहाकडून केला जाणार असल्याने या निर्णयाला कडाडून विरोध सभागृहात सुद्धा ठाकरे गटाकडून केला जाईल. एकीकडे अधिवेशन सुरू असताना मुंबईत याच धारावी पुनर्विकास प्रकल्प विरोधात ठाकरे गट मोर्चा काढून राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरणार आहे.

### आरोग्य विभागाशी संबंधित प्रकरण अधिवेशनात बाहेर आणली जाणार

आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप करत बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैशांचा व्यवहार होत असल्याचे काही पुरावे सादर करण्याचा ठाकरे गटाचा प्रयत्न असणार आहे.

### उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचा अधिवेशनादरम्यान सहभाग

उद्धव ठाकरे हे ११ किंवा १२ डिसेंबर दरम्यान नागपुरात अधिवेशनासाठी उपस्थित राहणार आहेत. तर आदित्य ठाकरे हिवाळी अधिवेशनात पूर्णपणे सहभागी राहून सरकारला या अशा अनेक प्रश्नांवर जाब विचारणार आहे.

# मुख्यमंत्री पदासाठी तिकडमबाजांची कोल्हेकुई : आ.यशोमती ठाकुर यांचे टीकास्त्र

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

तीन राज्यांच्या निवडणुकामध्ये यश मिळवल्यानंतर भारतीय जनता पक्षाला आपण आभाळाला हातटेकवले असल्याचा आभास होतो आहे. त्याच जोरावर भाजपाने मुख्यमंत्री पदावर दावा करायला सुरुवात केल्याने आता महायुतीतील सर्वच तिकडमवाजाची मुख्यमंत्री पदावरून कोल्हेकुई सुरू झाल्याची काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी केली आहे.



नुकताच झालेल्या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला सत्ता स्थापन करता आल्याने आता सर्वच राज्यांमधील परिस्थिती आपल्याला अनुकूल असल्याचा भास त्यांना होतो आहे. मात्र, महाराष्ट्रातील परिस्थिती वेगळी आहे, आणि महाराष्ट्राने नेहमीच संवेदनशीलपणे मतदान केले आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्राला अधोगतीकडे नेणाऱ्या, जातीय विष पेरणाऱ्या या तिकडमबाज सरकारला महाराष्ट्रातील जनता गाडल्याशिवाय राहणार नाही. उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिग अशी आपल्याकडे एक म्हण आहे. या असंविधानिक सरकारमधील प्रत्येक पक्षाचे तेच झालं आहे. प्रत्येक पक्षाच्या नेत्याला आपणच मुख्यमंत्री होणार याची आता स्वप्न पडू लागली आहेत. त्यामुळे महायुतीच्या या तिकडमबाज सरकारमध्ये आत्ताच मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतनेते उतरल्याने कुणाचा कुणाला पायपोस राहिलेला नाही, केवळ सत्तेच्या लालसेपोटी महाराष्ट्रातील जनतेला महागाईच्या आणि बेरोजगारीच्या खाईत ढकलणाऱ्या, आरक्षणावरून जाती-जातीत तेढ निर्माण करणाऱ्या या सरकारला जनता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असेही अँड. ठाकूर यावेळी म्हणाल्या.

# ३२ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर ३७० कुटुंबियांचे होणार पुनर्वसन कामास होणार लवकरच सुरुवात

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक वरुड**

वरुड तालुक्यात १९९१ मध्ये आलेल्या महापुरामुळे बाधित झालेल्या विविध गावांतील ३७० कुटुंबीयांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आता निकाली निघणार आहे. विशेष बाब म्हणून याबाबत शासननिर्णय निर्गमित झाला असून लवकरच या कामास सुरवात होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

वरुड तालुक्यात १९९१ मध्ये महापुराने थैमान घातले होते. यात अनेक गावे कुटुंबीय बाधित झाले होते. खानाखुणा मात्र अजूनही सोबतच आहेत. गावात पुराचे पाणी घुसल्याने संसार वाहून गेले, नागरिक उघड्यावर आले. त्यात हातूर्णा, भापकी, पळसवाडा येथील कुटुंबेही बाधित झाली होती. गेल्या बत्तीस वर्षांपासून या कुटुंबीयांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायम होता. आज ना उद्या कधीतरी आपले पुनर्वसन होईल, या आशेवर बाधित कुटुंबीयांनी तब्बल ३२ वर्षे प्रतीक्षा केली. पुनर्वसन होणार्या जागेवर हातूर्णा येथे जलकुंभ, नाल्या यापूर्वी करण्यात आल्या. यादरम्यान अनेक सत्ता आल्या, चेहरे बदलले मात्र प्रश्न जैसे थेच राहिला. अखेर या प्रश्नासाठी आमदार देवेंद्र भुयार सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश येऊन शासनाने तालुक्यातील वरील तीन गावांतील ३७० कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याकरिता निधीची मंजुरी दिली आहे. यात हातूर्णा येथील १६७, पळसवाडा येथील १०२ तर भापकी येथील १०१ अशा ३७० कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी सहा कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचा शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

# सीईओंनी घेतली पशुसंवर्धनची बैठक सर्वच विभागाच्या एचओडीची हजेरी



**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचे सचिव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या निर्देशानुसार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा यांनी सोमवारी झेडपीच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात पशुसंवर्धन विभागाच्या योजना व प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त सीईओ संतोष जोशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, सहायक आयुक्त डॉ. राजीव खेरडे, उपायुक्त कार्यालयाचे सहायक उपायुक्त शिवेंद्र महल्ले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके आदी उपस्थित होते. यावेळी सभेत भारत पशुधन मिशन, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान, जागतिक बँक सहाय्यित स्मार्ट प्रकल्प, डिस्ट्रिक स्ट्रॅटेजिक प्लन, जिल्ह्यातील गायी, म्हशीमध्ये करण्यात आलेली कृत्रिम रेतने व त्यापासून जन्मलेली वासरे, पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत दुधाळ जनावरांचे गट, शेळी-मेंढी गट, कुक्कुट व्यवसाय, वैरण विकास कार्यक्रम, मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास नसलेले अधिकारी, कर्मचारी तपासणी केलेल्या कारवाईचा अहवाल, राज्यव्यापी वंध्यत्व निवारण अभियान आदी विषयांचा आढावा सीईओंनीघेतला. अनेक विषयांवर सीईओंनी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना या बैठकीदरम्यान दिल्या आहेत. विशेष म्हणजे पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांनी पशुसंवर्धन विभागाचा आढावा घेतला आहे. या बैठकीला सहायक उपायुक्त पूनम नागापुरे, साधना घुगे, नाना पेठे, शशिकांत कानफाडे महाविमचे सोसे आणि आत्मा प्रकल्पाचे देशमुख आदी अधिकाऱ्यांसह १४ तालुक्यांचे पशुधन विकास अधिकारी विस्तार आदी उपस्थित होते.

# रात्री कार चालवायचीच नाही; सर्वाधिक अपघात रात्री १ ते पहाटे ५ दरम्यान वाहनचालकांनो, सावध व्हा; घरी तुमची कुणी वाट पाहताहेत

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्ह्यात होणाऱ्या अपघातांचेअवलोकन केले असता सर्वाधिक अपघात मध्यरात्रीच्या सुमारास होत असल्याचे दिसून येते. रात्री १ ते पहाटे ५ वाजतापर्यंतचा हा काळ डेंजर समजला जातो. यातच बहुतांश अपघात घडले आहेत.

दुचाकी असो की चारचाकी, यांचेच अपघात जास्त झाले आहेत. त्यानंतर ट्रक आणि टिप्परचा समावेश येतो. रात्रीच्या सुमारास वाहन चालकाला डुलकी लागल्यास किंवा समोरचे दिसत नसल्यास अपघात घडतो. वाहनांची लाईट डोळ्यांवर पडल्यामुळे डोळे दीपतात. अंदाजाने वाहन चालवावे लागते. त्यामुळेही अनेकदा अपघात घडतात. त्यामुळे रात्रीच्या सुमारास



सर्वाधिक अपघात होत असतात, तसेच सायंकाळच्या संधी प्रकाशातही अपघाताचे प्रमाण अधीक असल्याची नोंद आहे.सायंकाळ झाल्यानंतर प्रत्येकालाच घरी जाण्याची ओढ लागलेली असते. त्यामुळे वाहनांची गती वाढवली जाते. त्यामुळे अनेक अपघात घडतात. ट्रक चालकाला पहाटे आलेल्या डुलकीमुळे ट्रकचे अपघात घडल्याचेही समोर आले आहे.

**दिवसा अपघाताचे प्रमाण १५ टक्के**

जिल्ह्यात दिवसा अपघातांचे प्रमाण केवळ १५ टक्के असल्याची माहितीही समोर आली आहे. दिवसा घडलेल्या अपघातांमध्ये वाहन चालकाने जाणून बुजून केलेल्या चुकीमुळे अपघात घडल्याचे प्राथमिक स्तरावर दिसून येते.

**वाहने वाढली, रस्ते तेवढेच**

मागील दहा वर्षाच्या कालावधीत वाहनांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. मात्र, रस्ते रुंद झाले नाहीत. त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढून अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

# आरोग्य जपणारा सेंद्रिय भाजीपाला मिळतो कुठे? उत्पादन कमी : सेंद्रिय भाजीपाल्याची मागणी अधिक

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शेणखत, गांडूळखत, हिरवळीचे खत, राखेपासून तयार केलेल्या सेंद्रिय खतातून पिकवलेला भाजीपाला खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्यामुळे सेंद्रिय पद्धतीने पिकविलेल्या भाजीपाल्याची मागणी वाढत आहे. मात्र, भाजीपाला पिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर करण्यात येतो. असा भाजीपाला खाल्लूयास आरोग्यास धोका होण्याची शक्यता असते.



जिल्ह्याच्या कृषी विभागाच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला प्राधान्य देण्यात येत आहे. शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. त्यातच नागरिक आरोग्याप्रती जागृत झाले असल्याने सेंद्रिय शेतीतील भाजीपाला खाण्यास पसंती देत आहेत. त्यामुळे मागील काही वर्षाच्या तुलनेतसेंद्रिय शेतीचा पेरा वाढला आहे. अनेकदा तर ग्राहक सेंद्रिय शेतीतून पिकवलेला भाजीपाला मिळतो कुठे, असा प्रश्न जिल्ह्यातील बाजारपेठेत करताना दिसून येत आहेत.

**सेंद्रिय भाजीपाला लागवडीसाठी मिळते अनुदान**

सेंद्रिय भाजीपाला लागवडीसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढीची चांगली संधी आहे.

**सेद्रिय भाजीपाला आरोग्यासाठी लाभदायी**

सेंद्रिय भाजीपाला आरोग्यासाठी लाभकारक असतो. रासायनिक खतांचा भाजीपाला खाल्लूयाने विविध आजार जडण्याची शक्यता असते.

**गृहिणी म्हणतात...**

रासायनिक भाजीपाल्यापेक्षा सेंद्रिय भाजीपाला चवीला रुचकर असतो. त्यामुळे बाजारपेठेत मागणी असते. परंतु, सेंद्रिय भाजीपाला मिळत नसल्याने नाईलाज होत आहे.

**सेंद्रिय भाजी च्या नावाखाली फसवणूक**

अमरावती शहरातील अनेक भागात काही भाजी विक्रेते सेंद्रिय भाजीपाला विक्रीच्या नावाने फसवणूक करीत भाजी विकतात. मात्र अश्या भाजी विक्रेत्यांमुळे ज्यांची खरी सेंद्रिय पद्धतीने लागवड करून भाजी पिकविली असते त्यांचे नुकसान होते त्या मुळे कृषी विभागाने या कडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# भरडधान्य खरेदी नोंदणीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आधारभूत किंमत खरेदी योजनेत भरडधान्य ज्वारी व मका खरेदीसाठी शेतकरी बांधवांकडून ऑनलाइन नोंदणीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. परंतु, नोंदणी पुरेशी झालेली नसल्याने भरडधान्य खरेदीच्या ऑनलाईन नोंदणीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे.

पात्र व इच्छुक शेतकऱ्यांनी ३१ डिसेंबरपर्यंत ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी केले आहे. आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्य शासनामार्फत भरडधान्य ज्वारी व मका खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालयामार्फत अचलपूर, मोर्शी, वरूड, धामणगाव रेल्वे या चार तालुक्यांत खरेदी केंद्र उघडण्यात आली आहेत.

# पर्यटनस्थळाजवळ टुमदार निवास? अर्ज भरा, पुरस्कार मिळेल झकास!

## ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या वतीने स्पर्धा

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मागील काही वर्षांपासून पर्यटनाची व्याख्या बदलते आहे. घरापासून दूर राहून केवळ ऐशोआराम करणे यावर मर्यादित न राहता शहराच्या धकाधकीतून लांब जाऊन ग्रामीण पर्यटन अनुभवणे आणि तेथील राहणीमान, खाद्यसंस्कृती जाणून घेण्याचा ट्रेंड वाढला आहे. हेच लक्षात घेऊन ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाने सर्वोत्कृष्ट ग्रामीण पर्यटन गाव आणि सर्वोत्कृष्ट ग्रामीण घरगुती निवासाला पुरस्कार देण्याचे आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी केंद्र शासनाच्या पर्यटन विभागाला अर्ज पाठविण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्यात सर्वाधिक ग्रामीण पर्यटनात रायगड, अलिबाग, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर , कर्जत ही ठिकाणे प्रसिद्ध आहेत. या ठिकाणच्या निसर्गाच्या सानिध्यातील गावांतील घरगुती निवास सेवांना या स्पर्धेच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय स्तावर पोहोण्याची संधी मिळणार आहे. परिणामी, यामुळे पर्यटनाला अधिक प्रोत्साहन मिळेल, आणि पर्यटकांचा ओघ वाढेल हा पर्यटन विभागाचा उद्देश आहे.



ग्रामीण पर्यटनात पर्यटकांचा अधिक कल अनुभवातून पर्यटनाकडे आहे. पर्यटकांना स्थानिक लोकसंस्कृती, खाद्यसंस्कृती , कला , राहणीमान जाणून घेण्याची अधिक इच्छा असते, त्यामुळे यातून पर्यटनाला नक्कीच बूस्ट मिळेल असे विभागाने म्हटले आहे.

**अशी आहे पात्रता**

अर्जदार हा जास्तीत जास्त २५ हजार लोकसंख्या असलेल्या गावाचा रहिवासी असावा. पर्यटन स्थळांच्या परिसरात गाव असावे. परिसरात उपक्रम-शेती, हस्तकला, लोकल खाद्यपदार्थ असावेत, अशा अटी आहेत. तर घरगुती निवास हे ग्रामीण भागात असावे. ग्रामीण घरगुती निवास कमीत कमी एक वर्षापासून कार्यान्वित असावे. ग्रामीण घरगुती निवास नोंदणीकृत असावे, अशा अटी आहेत.

**अशी आहे अर्ज प्रक्रिया**

गावांनी या नामांकनासाठी www.rural.tourism.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे. अधिक माहितीसाठी www.rural.tourism.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन पर्यटन विभागाने केले आहे.

# उद्यापासून नागपुरात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन; मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजणार

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**
**नागपूर**



शिंदे सरकारचे यंदाचे हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपुरात सुरु होणार आहे. त्यामुळे मंत्री आमदारांसह सरकारच्या सर्व यंत्रणा नागपुरात मुक्कामी असणार आहे. सध्याच्या राज्यातील प्रश्नांना घेऊन हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. या अधिवेशनाच्या काळात विविध आंदोलने होणार आहेत. जवळपास १०० मोर्चे विधिमंडळात धडकणार असल्याची माहिती आहे. यातच्या ४५ पेक्षा जास्त मोर्चांना आतापर्यंत परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे सभागृहासह सभागृहाच्या बाहेरच्या आंदोलनांनी यंदाचे अधिवेशन गाजणार आहे.

उद्यापासून सुरु होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात अनेक मुद्दे चर्चिले जाण्याची शक्यता आहे. सध्या राज्यात गाजत असलेला मराठा आरक्षणाचा मुद्दा यंदाच्या अधिवेशनात चर्चेत येऊ शकतो. मराठा आरक्षणासोबतच ओबीसी आरक्षणाचा मुद्दाही विरोधक लावून धरू शकतात. काही दिवसांआधी राज्यात अवकाळी पाऊस झाला. यामुळे शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. या नुकसानीची भरपाई, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी या मुद्द्यांवरुन सभागृहात खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

थोड्याच वेळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्र्याचं नागपुरात आगमन होईल. पाच वाजता मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी चहानापाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सरकार वतीने आयोजित करण्यात आलेल्या चहानापावर विरोधक बहिष्कार घालण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. आज संध्याकाळी सहा वाजता मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पत्रकार परिषद घेणार आहेत.

अधिवेशनात सरकारला घेरण्याची रणनिती ठरवण्यासाठी विरोधी पक्षांची बैठक होणार आहे. विरोधकांच्या बैठकीत विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार, अंबादास दानवे, अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड यासह प्रमुख नेते उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा फौजफाटा नागपुरात पोहचला आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नागपुरात ११ हजार पोलिस तैनात करण्यात आल्याची माहिती आहे. तर विरोधकही आक्रमक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. हिवाळी अधिवेशनादरम्यान नागपुरात चोख पोलीस बंदोबस्त असणार आहे. तर व्हीआयपी सुरक्षा ही पोलीसांची प्राथमिकता असणार असून राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, दंगा नियंत्रण पथक असणार २४ तास तैनात असणार आहे. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी पोलिसांवर असणार आहे, अशी माहिती नागपूर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्तिकलशाला अभिवादन करण्यासाठी कॉंग्रेसची अभिवादन यात्रा

## हजारों अनुयायांचा पायदळ पदयात्रेत सहभाग



**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

महामानव ड़ॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दीना निमित्य अमरावती मध्ये शहर आणि ग्रामीण कॉंग्रेस च्या वतीने पायदळ अभिवादन यात्रा काढण्यात आली.जिल्ह्यातील नया अकोला येथे ड़ॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिस्तूप आहे ज्याना चैत्य भूमिवर जाता येत नाही त्यांना हे ठिकाणी माहिती व्हावी यासाठी कॉंग्रेस ने पायदळ अभिवादन रॅली काढली या रॅलीमध्ये हजारोअनुयायी सहभागी झाले होते.

आज सकाळी अमरावतीच्या इर्विन चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून ही यात्रा सुरू झाली यावेळी माजी पालकमंत्री आमदार यशोमती ठाकूर, माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख,आमदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप यासह अनेक कॉंग्रेसचे नेते या यादीमध्ये सहभागी झाले होते.

१५ किलोमीटरची रॅली काढत आंबेडकरांच्या कार्याचं स्मरण करण्यात आलं आहे. अमरावतीतील इर्विन चौक ते नया अकोला अशी १५ किलोमीटची अभिवादन पदयात्रा काढण्यात आली आहे.

अमरावतीत आज महापरिनिर्वाण दिनानिमित्त कॉंग्रेसकडून अभिवादन यात्रा काढण्यात आली आहे. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळून या अभिवादन यात्रेला सुरुवात झाली आहे. पुढे नया अकोला येथील बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी स्मारकापर्यंत ही अभिवादन यात्रा जाणार आहे. जवळपास १५ किलोमीटरची ही अभिवादन पदयात्रा असणार आहे. कॉंग्रेस नेत्या यशोमती ठाकूर देखील या यात्रेत उपस्थित आहेत.

इर्विन चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरू झालेली ही रॅली शेगाव नाका, कठोरा नाका, हर्षराज कॉलनी, नवसारी, तिवसा, वलगाव मार्गे नया अकोल्याला पोहोचेल. ही रॅली नया अकोला इथे पोहचल्यानंतर अभिवादन सभा होईल. अन् रॅलीची सांगता करण्यात आली. या ठिकाणी कन्हैय्याकुमार, प्रा.रावसाहेब कसबे यांची विशेष उपस्थिती होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी अमरावतीच्या इर्विन चौकात हजारों अनुयायी सकाळ पासुन रांगा लावून बाबासाहेबांना अभिवादन केले.

# पुन्हा अवकाळी, शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी

## फळबाग, भाजीपाला,तूर,कपाशी उत्पादक शेतकरी संकटात

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अंदाज लागला नसतानाच पुन्हा ढग काळवंडले आहेत. संपूर्ण अमरावती जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने व शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

आंध्रच्या किनारपट्टीवर धडकलेल्या चक्रीवादळाचा परिणाम विदर्भातील हवामानावरही जाणवत आहे. विदर्भात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने अमरावती जिल्ह्यातील वातावरण गेल्या २४ तासात झपाट्याने बदलले आहे. बदललेल्या वातावरणामुळे मंगळवारी रात्री जिल्ह्यातील काही तालुक्यात तुरळक पाऊस झाला.रात्री अनेक गावांमध्ये रिमझिम पावसाची नोंद झाली. बुधवारी सकाळपासूनच जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. त्यामुळे थंडीमध्ये भर पडली आहे. दरम्यान, हवामान व कृषी विभागाने ६ ते ८ डिसेंबरपर्यंत येलो अर्लट जाहीर केला आहे.

# मोर्शी तालुक्यातील हिवरखेड महसूल मंडळाला अवकाळी पावसाने झोडपले

## संत्राचा आंबिया बहार धोक्यात ; संत्रा उत्पादक शेतकरी संकटात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**
**मोर्शी**



मोर्शी तालुक्यासह हिवरखेड महसूल मंडळात बुधवार ता. ६ डिसेंबर रोजी जोरदार अवकाळी पाऊस झाला आहे. या अवकाळी पावसामुळे संत्रा, मोसंबी, कापूस, तूर, भाजीपाला यासह आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून याचा सर्वाधिक फटका हिवरखेड महसूल मंडळाला बसला आहे. २६ ते २९ नोव्हेंबर, १ डिसेंबर व ६ डिसेंबर रोजी हिवरखेड महसूल मंडळात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने संत्रा उत्पादक शेतकरी नैसर्गिक संकटात सापडला आहे.

मोर्शी तालुका विक्रमी संत्रा विक्रमी संत्रा उत्पादनासाठीप्रसिद्ध असून संत्राचा आंबिया बहार घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणीत भर टाकणारा अवकाळी पाऊस ठरत आहे. मागील बारा दिवसांपासून ढगाळ वातावरण व सतत अवकाळी पाऊस पडत असल्याने मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकरी चांगलाच हवालदिल झाला असताना आता पुन्हा ६ डिसेंबर रोजी मोर्शी तालुक्यातील हिवरखेड मंडळातसह आदी भागात जोरदार अवकाळी पाऊस झाला असून संत्रा बागेत बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. मोर्शी तालुक्यात आंबिया बहार संत्रा घेणाऱ्या शेतकऱ्यांनी संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यांनी संत्रा बागा ताणावर सोडल्या आहेत. अवकाळी पावसामुळे आंबिया बहर फोडणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अवकाळी पावसामुळे आंबियाच्या नव्या फुटींवर परिणाम होऊन कोट्यावधी रूपयांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आंबिया बहार घेणाऱ्या शेतकऱ्यांकडून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून बागेचे पाणी बंद केले जाते. त्यानंतर १० ते १५ जानेवारीपासून संत्रा बागेला पाणी दिले जाते. अशा प्रकारे व्यवस्थापन केल्यानंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात फूलधारणा होण्यास सुरुवात होते. मात्र अवकाळी पावसामुळे हे सारे व्यवस्थापन प्रभावित झाल्याने संत्राचा आंबिया बहर घेणाऱ्या शेतकऱ्यांसमोरील अडचणीत वाढ झाली आहे.गेल्या बारा दिवसांपासून मोर्शी तालुक्यांत अवकाळी पाऊसाने थैमान घातले आहे. अस्मानी संकटाने मोर्शी तालुक्यातील शेतकरी, शेतमजुरांच्या आयुष्याची घडी विसकटून टाकली आहे. एकीकडे नैसर्गिक आपत्ती ओढवली असताना हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. महाराष्ट्रात कधीही झाले नाही ऐवढे कोट्यावधी रूपयांचे नुकसान अवकाळी पावसामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे झाल्याने नैसर्गिक संकटाचे गांभीर्य ओळखून आपद्ग्रस्तांना मदत करण्याची आवश्यकता आहे.राज्यकर्त्यांनी प्राधान्यक्रम ठरवताना अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना आपत्तीतून बाहेर काढण्यासाठी पावले उचललीच पाहिजेत. राजाने मारले अन् पावसाने झोडपले तर तक्रार कुणाकडे करायची, अशीच गत मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची झालेली आहे.

# जिल्ह्यात मोकाट श्वानांची ना नसबंदी,ना उपाययोजना

## भटक्या कुत्र्यांच्या दंशाच्या घटनेत झाली वाढ; यांना आवरणार कोण?

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**





हरयाणा आणि पंजाबमध्ये एखाद्याला कुत्रा चावला तर प्रत्येक खुणेसाठी दहा हजार आणि जखम ०.२ सेंटिमीटरपर्यंत असेल तर २० हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश आहेत. तर दुसरीकडे महाराष्ट्रात कुत्रा चावला तर बऱ्याचदा ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयात अँटी रेबीज इंजेक्शनही मिळू शकत नाही. मात्र, जिल्हा सामान्य रुग्णालयात पुरेपूर साठा उपलब्ध असल्याचे डॉ.सांगतात.

अमरावती शहरासह जिल्ह्यातही मोकाट श्वानाचा प्रश्न नेहमीच समोर येत असतो. चौका-चौकात, गल्लोगल्ली श्वानांचा घोळका दिसून येत असतो. दहशतीमुळे लहान-लहान मुलांना घराबाहेर पडणे कठीण होते. श्वानाने चावा घेतल्याच्या घटनाही सध्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. असे असतानाही महापालिकेकडून कोणतेही ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी सध्या अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे मात्र या कडे अधिकाऱ्यांसह नेते मंडळी ही साफ दुर्लक्ष करतांना दिसत आहे.

**कुत्र्यांची ना नसबंदी, ना उपाययोजना**

एकीकडे शहरामध्ये मोकाट श्वानांचे चौकाचौकात घोळके दिसून येताहेत. हे श्वान लहान-लहान मुलांवर हल्ला करीत असतात. चावा घेत असतात; मात्र महापालिकेकडून वेळीच ना नसबंदी ना अन्य उपाययोजना केल्या जात आहेत.त्यामुळे शहरात मोकाट श्वानांच्या प्रमाणात अधिक वाढ होत आहे.

**भटक्या कुत्र्यांना आवरणार कोण?**

शहरातील प्रत्येक चौका-चौकात कुत्र्यांचे झुंडच दिसून येत असतात. त्यांना महानगरपालिका,नगर परिषदेकडून प्रतिबंध होत नाही.

कुत्रे अनेकदा दुचाकी व चारचाकी वाहनांचा पाठलाग करतात. अनेकांना चावाही घेतात; या मोकाट श्वानांमुळे अनेक अपघात झाले आहेत मात्र त्यांचा बंदोबस्त करण्यात पालिका प्रशासन स्पेशल अपयशी ठरल्याचे दिसून येते.शहरामध्ये व जिल्ह्यात श्वान चावल्याच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. आठवड्यातून किमान एक किंवा दोन घटना तरी समोर येतात. त्यामुळे उपाययोजनांची मागणी पुढे येत आहे.

**शासकीय रुग्णालयात अँटी रेबीज इंजेक्शन मिळते कुठे ?**

जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात अँटी रेबीज इंजेक्शन लस उपलब्ध असावी, असे शासनाचे निर्देश आहेत; मात्र ग्रामीण भागात लसच उपलब्ध नसते.

**लस सर्वत्र उपलब्ध करा**

कुत्रा चावल्यानंतर प्रत्येक रुग्णालयात रुग्णांना वेळेवर लस उपलब्ध व्हावी, यासाठी सर्व शासकीय रुग्णालयात लस उपलब्ध करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने ग्रामीण रुग्णालयात लसीची उपलब्धता करावी.

# आता वेटिंग एरिया आणि फूड कोर्ट देखील

## विधानभवन परिसराला मिळाला नवा लूक : कॅन्टीन हटवली

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक**
**नागपूर**



उद्या पासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. राज्याच्या सत्तेचे केंद्र असलेल्या विधानभवनाला नवे रूप देण्यात आले आहे. आता येथे वेटिंग एरिया आणि फूड कोर्टही तयार करण्यात आले आहे.

अधिवेशन काळात विधानभवनाच्या आवारात मोठी गर्दी जमते. आमदारांपासून ते अधिकारी आणि इतर पाहुण्यांना बराच वेळ उभे राहावे लागत होते. इतकेच नव्हे तर म विधानभवनाकडे जाणाऱ्या मार्गावर कॅन्टीन आणि ज्यूसचे स्टॉल्स वगैरेही होते.या समस्येतून सुटका करण्यासाठी अ यावेळी कॅन्टीन हटवून मागच्या बाजूला फूड कोर्ट तयार करण्यात आले आहे. येथे मोठे कैंटीन आणिइतर स्टॉल्स असतील. दुसरीकडे ज्या ठिकाणी कॅन्टीन असायची तिथे आता वेटिंग एरिया तयार करण्यात आला - आहे. यात मंत्री, आमदार, अधिकारी आणि जनतेसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहे. तसेच गेटवरून येणाऱ्या नेत्यांची छायाचित्रे घेण्यासाठी माध्यमांसाठी विशेष व्यवस्थाही तयार करण्यात आली आहे. तसेच काँग्रेस कार्यालयाला लागूनच सार्वजनिक बांधकाम विभागाने तक्रार निवारण व मदत केंद्रही तयार केले आहे. या उपक्रमांमुळे विधानभवन परिसराला नवे रूप प्राप्त झाले आहे.

**आमदारांसाठी वाचनाची सुविधा**

विधानभवन परिसरातील ग्रंथालय कार्यालयात सुसज्ज ग्रंथालय तयार करण्यात आले आहे. याठिकाणी वाचनकक्षही तयार करण्यात आला असून तेथे आमदारांनाही वाचन करता येईल. एक छोटा वाचन कक्षही बनवण्यात आला आहे.

भांडी धुण्याच्या जागेवर विशेष लक्ष मागच्या हिवाळी अधिवेशनात टॉयलेटमध्ये भांडी धुतानाचे फोटो व्हायरल झाले होते. अशा स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे अधिक लक्ष दिले आहे. कैंटीन आणि खाद्यपदार्थाच्या स्टॉलसाठी स्वतंत्र धुण्याची जागा देण्यात आली आहे. यासोबतच एक भांडे धुण्यासाठी १० पोर्टेबल वॉशिंग प्लॅटफॉर्महीे तयार करण्यात आले आहेत. त्यांचा गरजेनुसार वापर केला जाईल.

# राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष किरण होले यांचे चंद्रभागा नदीपात्रात अर्ध दफन आंदोलन

## घरकुलधारकांना मिळणार मोफत वाळू: महसूल विभागाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**
**दर्यापूर**



दर्यापूर तालुक्यामध्ये मागील गेला कित्येक वर्षांपासून वाळूचा लीलाव न झाल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी वाळू उपलब्ध होत नाही तर दुसरीकडे दररोज मध्यरात्री तालुक्यातील चंद्रभागा नदीपात्रासह विवीध नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात वाळूचे तस्करी केल्या जात आहे. यासंदर्भात महसूल विभाग पोलीस प्रशासनाला माहिती असून सुद्धा त्यावर अद्यापही कुठलीही कारवाई करण्यात आलेले नाही त्यामुळे संदर्भात राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष किरण होले यांनी तहसीलदार यांना लेखी स्वरुपात पत्र देऊन अवैध्य वाळू उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई व्हावी व घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध व्हावी यासाठी निवेदन दिले होते परंतु प्रशासनाने त्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे अखेर राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष किरण होले यांनी महापरिनिर्वाण दिनी चंद्रभागा नदीपात्रात सकाळी नऊ वाजता पासून अर्ध दफन आंदोलन सुरु केले या आंदोलनामुळे प्रशासनाची चांगली तारांबळ उडाली होती. आंदोलन स्थळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पाहण्यासाठी गर्दी सुद्धा केली होती. जोपर्यंत अवैध वाळू उत्खनन करणारा कारवाई होत नाही व घरकुल लाभार्थ्यांना मोफत दरात वाळू मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन असेच सुरू राहील असी ठाम भूमिका राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष किरण होले यांनी घेतली होती. अखेर आंदोलन स्थळी खल्लार पोलीस व महसूल विभागाचे नायब तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी हे दाखल झाले व त्यांनी आंदोलन करते किरण होले यांच्या सर्व मागण्या ऐकून घेऊन वाळू उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल व घरकुल लाभार्थ्यांना मोफत दरात वाळू उपलब्ध करण्यात येईल असे लेखी स्वरूपात आश्वासन दिले. अखेर लेखी आश्वासनानंतर आंदोलन करते किरण होले यांनी आपले अर्ध दफन आंदोलन मागे घेतले.